cmyk

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

होळीच्या या पवित्र अग्नीमध्ये निराशा, दारिद्र्य, आळस यांचे दहन होवो आणि सर्वांच्या आयुष्यात आनंद, सुख, आरोग्य व शांती नांदो... –संपादक

नवी दिशा... नवे विचार.....

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३०५ | सोमवार दि.०२ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### खामेनेईंच्या हत्येनंतर जम्मू–काश्मीरमध्ये निदर्शने

श्रीनगरः इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनेई यांचा इस्रायल आणि अमेरिकेच्या संयुक्त हल्ल्यात मृत्यू झाला आहे. खामेनेई यांच्या मृत्यूनंतर जम्मू–काश्मीरमधील अनेक भागांत तीव्र निदर्शने करण्यात आली. श्रीनगर, सोनवारी आणि बांदीपोरा यांसारख्या भागांत मोठ्या संख्येने शिया समुदायातील महिला व पुरुष रस्त्यावर उतरले होते. आम्ही आमच्या नेत्याचे बलिदान कधीही विसरणार नाही, अशा घोषणा देत आंदोलकांनी खामेनेई यांचे फोटो हातात धरून आपला निषेध नोंदवला. बारामूला येथील एका महिला आंदोलकाने आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, शिया समुदाय बलिदान पत्करायला घाबरत नाही. आम्ही खामेनेई यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत.

### १९ किलोग्रॅमच्या एलपीजी सिलिंडरचे दर वाढले

नवीदिल्लीः एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढल्या आहेत. तथापि, ही १९ किलोग्रॅमच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरपुरती मर्यादित आहे. ही किंमत वाढ २८–३१ रूपये आहे आणि १ मार्च २०२६ पासून लागू झाली आहे. सरकारी मालकीच्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी) च्या वेबसाइटवरील माहितीनुसार, या वाढीनंतर, दिल्लीमध्ये १९ किलोग्रॅमच्या इंडेन एलपीजी सिलिंडर आता १७६८.५० झाले आहे, कोलकातामध्ये, किंमत १८४४.५० वरून १८७५.५० झाली आहे. मुंबईत, ती आता १७२०.५० मध्ये उपलब्ध असेल, जी पूर्वी १६९२ होती. चेन्नईमध्ये, किंमत १८९९.५० वरून १९२९ झाली आहे. घरांमध्ये वापरल्या जाणाऱ्या १४.२ किलोच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. तो शेवटचा ८ एप्रिल २०२५ रोजी सुधारित करण्यात आला होता.

### सौदीमध्ये अडकले ५० हजार मराठी मुस्लिम बांधव

नागपूरः रमजान काळात उमरा या धार्मिक विधीसाठी महाराष्ट्रातून सौदी अरेबियात गेलेले ५० हजार ते १ लाख मुस्लिम बांधव अडकले असल्याची भीती राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी व्यक्त केली. राज्य अल्पसंख्यांक आयोगाने यासंदर्भात तातडीने हालचाली सुरू करत सर्वांना सुरक्षित परत आणण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. यंदा राज्यातील सुमारे ५०० टूर ऑपरेटर्सनी उमरा या धार्मिक विधीसाठी यात्रेकरूंना पाठवले असून, त्यापैकी केवळ मुंबईतूनच १०० हून अधिक ऑपरेटर्स सक्रिय होते, अशी माहिती समोर आली आहे. राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी सांगितले की, यंदा राज्यातील ५०० हून अधिक टूर ऑपरेटर्समार्फत मुस्लिम बांधव उमरासाठी सौदी अरेबिया येथे गेले आहेत.

### न्यायालयाची भाजपला चपराक–अरविंद केजरीवाल

नवी दिल्ली : दिल्ली मद्य धोरण प्रकरणात न्यायालयाचा निर्णय म्हणजे भाजपला सणसणीत चपराक आहे, अशी टीका दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे नेते अरविंद केजरीवाल यांनी केली. दिल्ली मद्य धोरण प्रकरणात न्यायालयाकडून दिलासा मिळाल्यानंतर अरविंद केजरीवाल यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला. आम्हाला संपवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः या प्रकरणावर लक्ष ठेवून होते, असा गंभीर आरोप त्यांनी केला. दिल्लीत जंतर–मंतरवरील सभेत ते बोलत होते. दिल्लीतील राऊज अॅव्हेन्यू न्यायालयाने सीबीआयच्या प्रकरणात केजरीवाल यांच्यासह २३ जणांना निर्दोष मुक्त केले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२८ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६२.०० क्विंटल | २,००० | २,८५० | २,२४७ |
| ज्वारी/हायब्रिड: ६९.०० क्विंटल | २,००० | ४,७०० | ३,३४२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २०.५० क्विंटल | ६,५०० | ७,५९० | ७,२९७ |
| उडीद : ५.५० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |
| बाजरी: १२.०० क्विंटल | २,००० | २,९०० | २,५७७ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १४.५० क्विंटल | ५,२५० | ५,२५० | ५,२५० |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ४,७९१ | ५,००१ | ४,८९६ |

# छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेसाठी तब्बल 5,975.51 कोटींची मागणी

## कर्जमाफीबाबत उच्चाधिकार समितीच्या शिफारशींची प्रतीक्षा; ५०० कोटींच्या निधीचे वितरण सुरू

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेसाठी सन २०२६–२७ या आर्थिक वर्षात वित्त व नियोजन विभागाकडे तब्बल ५ हजार ९७५ कोटी ५१ लाख रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली आहे. याबाबतची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानसभेत दिली. तसेच हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या ५०० कोटी रुपयांच्या निधीचे वितरण करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**



राज्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळत नसल्याबाबत उद्धवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी विधानसभेत लेखी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या उत्तरात सहकार मंत्र्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना थकीत कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी आणि कर्जमाफीसह दीर्घकालीन उपाययोजना निश्चित करण्यासाठी ३० ऑक्टोबर २०२५ रोजी शासन निर्णयाद्वारे उच्चाधिकार समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जस्थितीचा सर्वंकष अभ्यास करून कर्जमाफी, कर्जपुनर्गठन, व्याजमाफी तसेच भविष्यातील कर्जबाजारीपणा टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत शासनाला शिफारशी करणार आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील शिफारशींचा सखोल विचार करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत सरकार निर्णय घेणार, असे पाटील यांनी नमूद केले. दरम्यान, राज्यात मागील काही वर्षांत अवकाळी पाऊस, दुष्काळी परिस्थिती आणि उत्पादन खर्चात वाढ यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती डळमळीत झाली आहे. अशा परिस्थितीत शेतकरी सन्मान योजना आणि संभाव्य कर्जमाफीकडे लाखो शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. निधीची मोठी मागणी आणि समितीची नियुक्ती यामुळे आगामी अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# मध्यपूर्वेत युद्धाचा भडका!

## भारतात पेट्रोल–डिझेलच्या किमती वाढण्याची शक्यता



मुंबई । प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसांपासून अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाने आता थेट युद्धाचे रूप धारण केले आहे. इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या भीषण हल्ल्यानंतर इराणनेही आक्रमक प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. या जागतिक तणावामुळे संपूर्ण जगाची चिंता वाढली असून, याचा सर्वात मोठा आणि थेट फटका भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेला बसण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.**

मध्य पूर्वेत युद्धाचा भडका उडाल्याने भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढू शकतात, असा जाणकार तज्ज्ञांचा अंदाज आहे. भारताला लागणाऱ्या एकूण कच्च्या तेलापैकी (क्रूड ऑईल) जवळपास

▶▶ पान २ वर

### भारतीय रुपया कमकुवत होणार

तेलाचे वाढते दर चुकवण्यासाठी भारताला अधिक डॉलर्स खर्च करावे लागतील. डॉलरची मागणी वाढल्याने भारतीय रुपया डॉलरच्या तुलनेत आणखी कमकुवत होईल, ज्यामुळे आयात होणाऱ्या इतर सर्वच गोष्टी (मोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स इ.) महाग होऊ शकतात. सध्या तरी भारत सरकार आणि तेल कंपन्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. भारताकडे स्वतःचा स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह (राखीव साठा) आहे, ज्यामुळे तातडीने इंधनाची टंचाई भासणार नाही. मात्र, अमेरिका–इस्रायल आणि इराण यांच्यातील हा संघर्ष असाच सुरू राहिला, तर येत्या काही आठवड्यांत भारतीयांना महागाई आणि पेट्रोल–डिझेलच्या दरवाढीचा मोठा झटका सहन करावा लागू शकतो.

### देशाचे परराष्ट्र धोरण उघडे पडले – काँग्रेस

पंतप्रधान आणि त्यांच्या टीमने कितीही ढोंग केले तरी, वास्तव हे आहे की, स्वयंघोषित विश्वगुरूच्या नेतृत्वाखालील भारताचे परराष्ट्र धोरण पूर्णपणे उघडे पडले आहे. पंतप्रधान मोदींच्या परराष्ट्र धोरणाची आणि पद्धतींची देशाला मोठी किंमत मोजावी लागत आहे, अशी टीका काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केली आहे. तसेच त्यांनी सहा मुद्दे मांडले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष पाकिस्तानशी जवळीक कायम ठेवत आहेत आणि ज्या व्यक्तीच्या भडकाऊ विधानांमुळे २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याची पार्श्वभूमी निर्माण झाली त्याच व्यक्तीचे ते वारंवार कौतुक करतात. अफगाणिस्तानविरुद्धच्या लढाईत अमेरिकेने पाकिस्तानला स्पष्टपणे पाठिंबा दिला आहे, असा आरोप काँग्रेसने केला आहे.

# अयातुल्लाह खामेनी यांच्या मृत्यूचा बदला घेणार

## इराणने अमेरिकेला दिला इशारा

तेहरान । वृत्तसंस्था

रविवारी (१ मार्च २०२६) रोजी इराणी उच्च अधिकाऱ्यांनी त्यांचे मारले गेलेले सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांचा बदला घेण्याची शपथ घेतली आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अभूतपूर्व बळकटी वाढविण्याच्या धमकीला झुगारून आखातातील अमेरिकन तळांवर हल्ल्यांचा एक नवा इशारा दिला.

तेहरानमध्ये गर्दी जमताच, स्फोटांचे आवाज आले आणि इस्रायली सैन्याने घोषणा केली की ते पुन्हा शहराच्या मध्यभागी असलेल्या लक्ष्यांवर हल्ला करत आहेत, कारण जेरुसलेम, रियाध, दुबई, दोहा आणि मनामा येथे आणखी स्फोटांचे आवाज ऐकू आले. इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी अयातुल्लाह खामेनी यांच्या



हत्येला ''मुस्लिमांविरुद्ध युद्धाची घोषणा'' घोषित केले आणि इशारा दिला. ''या ऐतिहासिक गुन्ह्याच्या गुन्हेगारांचा आणि सूत्रधारांचा बदला घेणे इराण आपले कायदेशीर कर्तव्य आणि अधिकार मानतो, असे ते म्हणाले. इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे शक्तिशाली प्रमुख अली लारीजानी यांनी जाहीर केले: शूर सैनिक आणि इराणचे महान राष्ट्र आंतरराष्ट्रीय अत्याचारींना अविस्मरणीय धडा शिकवेल. डोनाल्ड ट्रम्प यांच्या शैली आणि वक्तृत्वाचा

▶▶ पान २ वर


# राज्यसभेच्या सातही जागांवर उमेदवार उभे करा–अमित शाहांच्या थेट सूचना

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्च रोजी होणाऱ्या निवडणुकीत, सर्वाधिक तीन ते चार जागा जिंकण्याइतके आमदार संख्याबळ असलेल्या भाजपकडून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या व्यतिरिक्त आश्चर्याचा धक्का देणारी नावे जाहीर होऊ शकतात. यात एका अमराठी नेत्याच्या नावाचीही चर्चा आहे. विरोधकांच्या महाविकास आघाडीत उमेदवारीवरून झालेले वाद पाहता, पहिल्या टप्प्यात सहा जागांवर विजयाची खात्री असलेली सत्ताधारी महायुती ऐन वेळी सातव्या जागेसाठीही उमेदवार उतरवण्याची शक्यता आहे.

राज्यसभेसाठी भाजपकडून चार उमेदवारांची नावे ठरवण्यासाठी

▶▶ पान २ वर



# ग्रामस्थांचा कला केंद्रात राडा, खुर्च्या तोडल्या, वाहने फोडली

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील थापटी तांडा येथील कुलस्वामिनी कला केंद्रात शनिवारी रात्री उशिरा मोठा राडा झाला. एका किरकोळ वादाचे रूपांतर भीषण हाणामारीत झाले असून, संतापलेल्या सुमारे ३०० ग्रामस्थांच्या जमावाने कला केंद्रावर चाल करून मोठी तोडफोड केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला. दरम्यान या घटनेनंतर पाचोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या हल्ल्यावेळी कला केंद्रातील महिलांनी कसातरी आपला जीव वाचवला.

याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, रस्त्याने पायी जाणाऱ्या राजपूर येथील एका तरुणाला काही मद्यधुंद व्यक्तींनी क्षुल्लक

▶▶ पान २ वर

# देशात खग्रास तर राज्यात खंडग्रास चंद्रग्रहण दिसणार

पुणे । प्रतिनिधी

यावर्षी जगातून २ सूर्य आणि २ चंद्र ग्रहने दिसत असली तरी भारतातून ३ मार्च २०२६ रोजी दिसणारे वर्षभरातील केवळ एकच चंद्रग्रहण दिसणार आहे. भारतातून संध्याकाळी चंद्र उगवताच अरुणाचल प्रदेशातून खग्रास तर महाराष्ट्रातून खंडग्रास चंद्रग्रहण दिसणार असल्याची माहिती खगोल अभ्यासक आणि स्काय वॉच ग्रुप महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रा.सुरेश चोपणे यांनी दिली आहे.

खरे तर भारतातून चंद्र अदृष्य असताना दुपारी ०३.२० वाजता खंडग्रास ग्रहणाला सुरवात होईल. तर ४.३४ वाजता खग्रास चंद्रग्रहण दिसेल आणि ५.३२ मिनिटांनी खग्रास ग्रहण संपेल. भारतातून



केवळ अरुणाचल प्रदेशातून खग्रास चंद्रग्रहण दिसेल. कोलकाता येथून ९० %, टक्के, गडचिरोली येथून ३० टक्के, चंद्रपूर, नागपूर येथून चंद्र उगवताना २५ टक्के, पुणे येथे १० टक्के तर मुंबई येथे उंचीवर केवळ १ टक्के खंडग्रास ग्रहण दिसेल. विदर्भात संध्याकाळी ६.१८ ते ७.३३ वाजता


▶▶ पान २ वर

# महिलांच्या लैंगिक छळासंबंधी माहिती द्या–रूपाली चाकणकर

## राज्यभरातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यभरातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि खासगी कार्यालयांमध्ये 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३' म्हणजेच 'पॉश 'ऑडिट ची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी ३० दिवसांत विशेष ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी सर्व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.**



राज्यातील प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती कार्यरत आहे का, तिची रचना व कामकाज योग्य प्रकारे सुरू आहे का, याची खात्री करण्यासाठी हे 'पॉश ऑडिट' राबविण्यात येणार आहे. समिती अस्तित्वात नसल्यास तात्काळ स्थापना करावी, अन्यथा संबंधितांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ नुसार प्रत्येक शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळ, मंडळ, स्वायत्त संस्था तसेच खासगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. तसेच जिल्हास्तरावर स्थानिक तक्रार निवारण समिती कार्यरत असणे आवश्यक आहे.राज्य महिला आयोगाकडे येणाऱ्या तक्रारी, विविध अहवाल आणि

▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# पाठ्यपुस्तकातील विषारी मजकूर आणि न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा...

देशातील शिक्षणव्यवस्था ही केवळ ज्ञान देण्याचे माध्यम नसून भावी पिढीच्या विचारसरणीची जडणघडण करणारी सर्वात महत्त्वाची संस्था आहे. म्हणूनच शालेय पाठ्यपुस्तकांमधील प्रत्येक शब्द हा जबाबदारीने, वस्तुनिष्ठतेने आणि संतुलित दृष्टिकोनातून लिहिला जाणे अपेक्षित असते. परंतु राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी) इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकातील न्यायपालिकेबाबतच्या वादग्रस्त मजकुरामुळे निर्माण झालेल्या वादाने शिक्षणव्यवस्था, सरकार आणि न्यायव्यवस्था या तिन्ही स्तंभांना हादरा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या पुस्तकावर सरसकट बंदी घालत केंद्र आणि राज्य सरकारांना सर्व छापील व डिजिटल प्रती तातडीने मागे घेण्याचे आदेश देणे ही अत्यंत गंभीर आणि अभूतपूर्व घटना आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने या प्रकरणात व्यक्त केलेली तीव्र नाराजी ही केवळ एका पाठ्यपुस्तकापुरती मर्यादित नाही; ती शिक्षणाच्या माध्यमातून संस्थात्मक विश्वासावर घाला घालण्याच्या संभाव्य प्रयत्नांविरुद्धची कठोर भूमिका आहे. ''न्यायव्यवस्थेवर गोळी झाडण्यात आली असून ती रक्तबंबाळ झाली आहे,'' ही न्यायालयाची प्रतिक्रिया परिस्थितीची तीव्रता स्पष्ट करणारी आहे.

न्यायालयाने हे केवळ चूक किंवा दुर्लक्ष म्हणून न पाहता संभाव्य ''सुनियोजित कट'' म्हणून तपासण्याची गरज व्यक्त केली आहे. हे शब्द सहज उच्चारलेले नाहीत; ते न्यायपालिकेच्या प्रतिष्ठेवर झालेल्या आघाताची गंभीरता अधोरेखित करतात.

शालेय शिक्षणाच्या वयात विद्यार्थी संस्थांविषयी प्राथमिक समज तयार करतात. न्यायपालिका, विधिमंडळ आणि कार्यपालिका यांसारख्या लोकशाहीच्या स्तंभांविषयी त्यांची धारणा याच काळात आकार घेते. अशा संवेदनशील टप्प्यावर जर न्यायपालिकेबाबत एकतर्फी, संदर्भविहीन किंवा नकारात्मक चित्रण केले गेले, तर विद्यार्थ्यांच्या मनात संस्थांविषयी अविश्वासाची बीजे पेरली जाण्याचा धोका निर्माण होतो. न्यायपालिकेवर टीका करणे हे लोकशाहीचे लक्षण असले, तरी ती टीका तथ्याधिष्ठित, संतुलित आणि संदर्भासहित असणे अत्यावश्यक आहे. केवळ भ्रष्टाचाराचा उल्लेख करून न्यायपालिकेच्या सुधारणा, पारदर्शकतेसाठीचे प्रयत्न आणि घटनात्मक भूमिका दुर्लक्षित करणे हे वस्तुनिष्ठ शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांनाच छेद देणारे ठरते. या प्रकरणाने आणखी एक गंभीर प्रश्न समोर आणला आहे. एनसीईआरटीसारख्या प्रतिष्ठित संस्थेच्या संपादकीय आणि शैक्षणिक प्रक्रियेतील त्रुटींचा. देशातील लाखो विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके तयार करणाऱ्या संस्थेमध्ये बहुपातळी तपासणी, तज्ज्ञांचे पुनरावलोकन आणि तथ्य पडताळणी ही अनिवार्य प्रक्रिया असते. तरीही असा वादग्रस्त मजकूर अंतिम पुस्तकात कसा पोहोचला, याचे समाधानकारक उत्तर अद्याप मिळालेले नाही. जर ही चूक निष्काळजीपणामुळे झाली असेल, तर ती तितकीच गंभीर आहे; आणि जर ती हेतुपुरस्सर झाली असेल, तर त्याचे परिणाम अधिक दूरगामी ठरू शकतात. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने शिक्षण मंत्रालय आणि एनसीईआरटीच्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावणे आणि चौकशीचे संकेत देणे योग्यच म्हणावे लागेल. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलगिरी व्यक्त करून पुस्तक मागे घेण्याची घोषणा केली असली, तरी केवळ माफी पुरेशी ठरणार नाही. जबाबदारी निश्चित करणे, दोषींवर कारवाई करणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संस्थात्मक सुधारणा करणे आवश्यक आहे. शिक्षणव्यवस्थेवरील विश्वास टिकवण्यासाठी पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या दोन गोष्टी अत्यावश्यक आहेत. अन्यथा, अशा घटनांमुळे शैक्षणिक संस्थांच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. या घटनेत न्यायपालिकेची भूमिका देखील तितकीच महत्त्वाची आहे. न्यायालयाने स्वतःहून दखल घेत तातडीने हस्तक्षेप केला, हे लोकशाहीतील ''संरक्षक'' म्हणून न्यायपालिकेचे स्थान अधोरेखित करणारे आहे. न्याय केवळ दिला गेला पाहिजे असे नाही, तर तो होताना दिसलाही पाहिजे. हा लोकशाहीचा मूलमंत्र आहे. न्यायपालिकेवर जनतेचा विश्वास हा लोकशाहीच्या अस्तित्वाचा कणा आहे. त्यामुळे न्यायालयाने आपल्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासाठी कठोर भूमिका घेणे हे अपेक्षितच होते. तथापि, या घटनेतून व्यापक पातळीवर आत्मपरीक्षणाची गरजही अधोरेखित होते. लोकशाहीत कोणतीही संस्था टीकेपासून मुक्त नसते. न्यायपालिकेत प्रलंबित खटल्यांची प्रचंड संख्या, न्यायप्रक्रियेतील विलंब आणि पारदर्शकतेविषयीचे प्रश्न हे वास्तव आहे. या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी न्यायालय, सरकार आणि समाज यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण संस्थांवरील विश्वास केवळ कायदेशीर संरक्षणाने नव्हे, तर त्यांच्या कार्यक्षमतेने आणि पारदर्शकतेने टिकतो.

एनसीईआरटीच्या या प्रकरणाने शिक्षण, न्याय आणि शासन यांच्यातील परस्परसंबंध पुन्हा एकदा अधोरेखित केले आहेत. भावी पिढीला दिले जाणारे शिक्षण हे सत्य, संतुलन आणि जबाबदारी यांवर आधारित असले पाहिजे. अन्यथा, शिक्षण हे ज्ञानाचे साधन न राहता भ्रम आणि अविश्वासाचे माध्यम बनण्याचा धोका आहे. या घटनेतून धडा घेत शिक्षणव्यवस्थेतील नियंत्रण यंत्रणा अधिक मजबूत करणे, तज्ज्ञांचा सहभाग वाढवणे आणि संस्थात्मक उत्तरदायित्व निश्चित करणे ही काळाची गरज आहे.

लोकशाहीची मजबुती ही तिच्या संस्थांच्या विश्वासार्हतेवर अवलंबून असते. न्यायपालिका हा त्या विश्वासाचा अंतिम आधारस्तंभ मानला जातो. त्यामुळे त्या स्तंभावर संशयाची सावली टाकणारे कोणतेही पाऊल, ते जाणूनबुजून असो वा चुकून, तातडीने दुरुस्त केले गेले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे या प्रकरणाची गंभीरता अधोरेखित झाली आहे. आता खरी कसोटी सरकार, एनसीईआरटी आणि संपूर्ण शिक्षणव्यवस्थेची आहे, ते या घटनेतून धडा घेऊन भविष्यात शिक्षण आणि संस्थात्मक विश्वास यांचे रक्षण करण्यासाठी ठोस पावले उचलतात का, याकडे देशाचे लक्ष लागले आहे.

# पुण्य कर्म करणारा माणूस देव माणूस होतो–ह.भ.प.रामकृष्ण रंधवे महाराज

**बीड । प्रतिनिधी**

**प्रत्येकाने पीडित आणि रंजल्या, गांजल्यांची सेवा करावी. सेवेने माणूस मोठा होतो. सेवा केल्यास स्वामी होतो. सेवा करणाराच देव माणूस होतो. सेवाधर्म हा तुम्हाला दैवत्वाकडे घेऊन जातो, असे प्रतिपादन पाटोदा येथील विठ्ठल गड संस्थानचे मठाधिपती तथा गिनिज बुक ऑफ रेकॉर्ड प्राप्त कीर्तनकार ह भ प रामकृष्ण रंधवे महाराज यांनी केले.**



बीड येथील संत भगवान बाबा प्रतिष्ठान'वर भगवानबाबा सप्ताह समितीच्या वतीने आयोजित आयोजित सर्व धर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताहात 'तुज मागणे हे देवा । आम्हा तुझी चरण सेवा ।।आन नेघो तरी । रिद्धी सिद्धी मुक्ती चारी' ।। या जगतगुरु संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर बोलतांना ह भ प रंधवे महाराजांनी अप्रतिम आणि मनाला भिडणारे, मंत्रमुग्ध करणारे निरुपण केले. याप्रसंगी बोलताना ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज म्हणाले, सेवेत तन लावा. सत्कार्याला धन लावा. आणि परमार्थ मनोभावे करा. विचार बदललेले की जीवन बदलेल विचार बदलले की कृती बदलेल आणि विचार बदलला तर माणूस बदलेल विचार बदलल्यामुळेच जागृती होईल माणसं ही भगवंताची रूपे आहेत. देवाची सेवा करणारा देव माणूस होतो. पुण्यवान होतो. त्यामुळे प्रत्येकांनी पुण्यकर्म करावे. माणसे श्रीमंत असतील परंतु ती माणसं बेचैन असतात. परमार्थाला दुःखमुक्त करण्यासाठी असतो. पैशापेक्षा पुण्य श्रेष्ठ आहे. जीवनात पुण्यकर्म करावे. असेही सांगून त्यांनी विविध दृष्टांत दिले. भाविकांच्या हृदयाला भिडणारे रंगतदार कीर्तन त्यांनी केले.कीर्तनास मृदंगाचार्य ज्ञानेश्वर माऊली तांदळे गायनाचार्य हनुमंत महाराज येवले बंडू महाराज जटाळ, अंगद महाराज सोनवणे, किसन महाराज, अंगद महाराज मोरे, विणेकरी वाल्मीक महाराज चाटे, आदींची उपस्थिती होती. कीर्तनास पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, प्राचार्य डॉ. वसंत सानप, डॉ. प्रा. दत्तात्रय आघाव, बाजीराव खेडकर, हरिदास जोगदंड, प्रा. आर.टी. गर्जे, ॲड. जयंत राख राजेंद्र सानप, नारायण नागरे, नाना सानप, आदीसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.सुरेश धस यांना सोशल मीडियावरून जीवे मारण्याची धमकी; समर्थकांची पोलिसांत तक्रार

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा लोकप्रिय लोकनेते सुरेश धस यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह आणि जीवे मारण्याची उघड धमकी देणारी पोस्ट व्हायरल झाल्याने मतदारसंघात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी आ. धस यांचे समर्थक व कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशन आष्टी, अंभोरा आणि कडा येथे लेखी तक्रार दाखल करून संबंधितावर तातडीने कठोर कारवाईची मागणी केली आहे.**




समर्थकांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी फेसबुक या सामाजिक माध्यमावर एका व्यक्तीच्या अकाउंटवरून आ. धस यांच्याविरोधात अत्यंत भडकावू व धमकीच्या स्वरूपाचा मजकूर पोस्ट करण्यात आला. संबंधित पोस्टमध्ये आ. धस यांचा उल्लेख करत उघड इशारा देण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, सदर पोस्टचा सरळ अर्थ आमदारांना जीवे मारण्याची धमकी असा होत असून, त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अशा प्रकारच्या बेजबाबदार व चिथावणीखोर वक्तव्यांमुळे समर्थकांमध्ये संतापाची भावना निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो, असेही तक्रारदारांनी म्हटले आहे. लोकशाही व्यवस्थेत जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींविरुद्ध उघड धमक्या देणे ही अत्यंत गंभीर व दंडनीय बाब आहे. सामाजिक माध्यमांचा गैरवापर करून सार्वजनिक शांतता भंग करण्याचा आणि वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही समर्थकांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय दंड संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तातडीने कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा बसावा यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पोलिसांकडे करण्यात आली आहे. दरम्यान, तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिस प्रशासनाने संबंधित पोस्टची पडताळणी सुरू केली असून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. या घटनेच्या निषेधार्थ आष्टी, अंभोरा व कडा येथे आ. धस यांचे हजारो समर्थक उपस्थित राहून संताप व्यक्त केला.

# वाईट विचार, व्यसनं आणि सवयींना जाळून होळी करा

होळी सणानिमित्त सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी समाजाला आवाहन केले आहे की, यंदाची होळी ही केवळ रंगांचीच नव्हे, तर आपल्या जीवनातील वाईट सवयी, वाईट विचार आणि व्यसनांची होळी ठरावी. त्यांनी सांगितले की, वाईट सवयी आणि व्यसनांमुळे माणसाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उध्वस्त होत आहे. चला तर मग या होळीला आपण या सवयींच्या नकारात्मक चक्रातून बाहेर पडण्याचा संकल्प करूया..!



होळी सणानिमित्त सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी समाजाला आवाहन केले आहे की, यंदाची होळी ही केवळ रंगांचीच नव्हे, तर आपल्या जीवनातील वाईट सवयी, वाईट विचार आणि व्यसनांची होळी ठरावी. त्यांनी सांगितले की, वाईट सवयी आणि व्यसनांमुळे माणसाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उध्वस्त होत आहे. चला तर मग या होळीला आपण या सवयींच्या नकारात्मक चक्रातून बाहेर पडण्याचा संकल्प करूया. डॉ.इंगोले यांनी पुढे सांगितले की, वाईट सवयी सोडण्यासाठी पहिला टप्पा म्हणजे त्या सवयींची जाणीव होणे आणि त्यांच्यापासून दूर राहण्याचा दृढनिश्चय करणे. व्यसन किंवा वाईट सवयींमुळे होणाऱ्या हानीबद्दल लोकांना जागरूक करणे गरजेचे आहे. आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याला हानी पोहोचवणाऱ्या गोष्टींची होळी करून आपण एक नवीन सुरुवात करू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. अनेक वाईट सवयी या माणसाला आपोआप मानसशास्त्रातील प्लेजर प्रिंसिपलनुसार अर्थात मनाला तात्पुरतं समाधान, आनंद देणाऱ्या तत्वानुसार लागत असतात आणि त्या दिवसेंदिवस वाढत असतात. या लागलेल्या वाईट सवयींना आपले मन आणी शरीर सरावून जात आणि ती सवय आपल्याला दैनंदिन गरज भासते. परंतु, प्रत्येक व्यक्तीने हे समजून घेणे गरजेचे आहे. की, या सवयी जशा आपण स्वतःहून लावून घेतल्या आहेत. तसेच आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास या सवयी आपण निश्चितपणे सोडवू शकतो. उदारणार्थ : दारू, गांजा, तंबाखू, अतिखाने, अतिझोपणे, अभ्यास न करणे यामुळे तात्पुरते समाधान मिळत असते. म्हणून मानवाच्या मूळ स्वभावानुसार या सवयी जीवनाचा भाग बनून जातो. परंतु, ज्या वेळेस या वाईट सवयींबद्दल माणूस स्वतःला या सवयींचे होणारे दुष्परिणाम समजून सांगेल किंवा या सवयींमुळे आपल्या जीवनामध्ये कसा नकारात्मक परिणाम होत आहे हे समजण्याची प्रक्रिया जागृत करेल, त्यावेळी मनोनिग्रहाच्या आधारे व्यक्ती आपल्या सवयी सोडू शकतो. मादक पदार्थांच्या बाबतीत ही व्यसने मानवाच्या मेंदूतील पेशींना जागृत करण्याचे काम करीत असतात. संवेदनशील करण्याचे काम करीत असतात. त्यामुळे ठराविक वेळेला या पेशी ते पदार्थ शरीरामध्ये पोहोचले पाहिजेत, यासाठी क्रेविंग निर्माण करत असतात आणि ही क्रेविंग निर्माण झाल्यानंतर तो व्यसनी व्यक्ती त्यावेळेला ती व्यसने घेण्याचा प्रयत्न करतो आणि त्या वेळेमध्ये त्याला ती व्यसने न मिळाल्यास त्याला तीव्र स्वरूपाची बेचैनी, छातीत धडधड, थरथरी सुटणे, झोप न येणे, चिडचिड होणे, राग येणे घाम येणे, चक्कर येणे, पोटात दुखणे अशा विविध प्रकारची लक्षणे येऊ शकतात. परंतु, मानसोपचार तज्ज्ञांच्या सल्ल्याने योग्य औषधोपचार तसेच समुपदेशन केल्याने या व्यसनांची तीव्रता कमी होण्यास मदत होते आणि काही काळानंतर या व्यसनांची मेंदूला आणि शरीराला गरज वाटत नाही. अशाप्रकारे अनेक वाईट सवयी व व्यसने आयुष्यातून सोडविली जाऊ शकतात. यासोबतच चांगल्या सवयी लावण्यासाठी काही टिप्स देखील आहेत. वाईट सवयींच्या जागी चांगल्या सवयी विकसित केल्यास त्या सोडणे सोपे जाते. उदाहरणार्थ, तणावग्रस्त झाल्यावर सिगारेट ओढण्याऐवजी खोल श्वास घेणे किंवा ध्यानधारणा करणे, मोबाईल टीव्हीच्या ऐवजी खेळात किंवा वाचनात मन रमविणे यासारख्या पर्यायांचा अवलंब केला जाऊ शकतो. मनाची आणि शरीराची काळजी घेतल्यास आपण दीर्घकाळ निरोगी आणि आनंदी राहू शकतो. त्यामुळे या होळीला फक्त बाहेरच्या रंगांनीच नव्हे, तर जीवनातील वाईट सवयी, व्यसने आणि विचारांनाही निरोप देऊन साजरी करावी असे आवाहन डॉ.इंगोले यांनी होळीच्या पूर्वसंध्येस सर्वांना केले आहे.



**डॉ.राजेश इंगोले**
**(मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ, समाधान मानसोपचार रूग्णालय, अंबाजोगाई.),**
**मो.नं:९४२२२४०७१०**

## पान १ वरून...

### अयातुल्लाह खामेनी यांच्या

अवलंब करणाऱ्या एका सोशल मीडिया पोस्टमध्ये त्यांनी इशारा दिला. इराणने युनायटेड स्टेट्स आणि इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली आणि त्यांनी त्यांना दुखापत केली. आता आम्ही त्यांच्यावर अशा शक्तीने हल्ला करू जे त्यांनी यापूर्वी कधीही अनुभवले नाही. यापूर्वी, काही इराणी लोकांनी त्यांच्या मोठ्या नेत्याच्या मृत्यूच्या सुरुवातीच्या वृत्तांचा आनंद साजरा केला होता, परंतु राज्य माध्यमांनी त्यांच्या हत्येची पुष्टी केल्यानंतर अमेरिकेला मृत्युदंड, असे म्हणत सरकार समर्थक निदर्शने देखील झाली. जमावाने सूड घेण्याची मागणी केली आणि इराणच्या सैन्याने आखाती देश आणि इराकी कुर्दिस्तानमधील अमेरिकन तळांवर हल्ले करण्याची घोषणा केली.

--------------

### मध्यपूर्वेत युद्धाचा

८५% तेल आपण आयात करतो. यातील बहुतांश तेल मध्यपूर्वेतील देशांमधून येते. युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. सध्या कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल ७५ ते ८० डॉलर्सच्या आसपास गेले आहेत. जर हे युद्ध लांबले, तर हे दर १०० डॉलर्सच्या पार जाऊ शकतात. असे झाल्यास भारतीय तेल कंपन्यांवर प्रचंड आर्थिक दबाव येईल आणि त्यांना नाईलाजाने भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवाव्या लागतील. जगातील जवळपास २०% ते २५% खनिज तेल इराणच्या जवळ असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाते. भारताला येणारे जवळपास ५०% तेल याच मार्गाने येते. इराणने हा मार्ग रोखल्यास तेलाचा पुरवठा खंडित होईल. इंधनाचे दर वाढले की त्याचा थेट परिणाम वाहतूक व्यवस्थेवर होतो. पेट्रोल आणि डिझेल महाग झाल्यामुळे मालवाहतुकीचा खर्च वाढेल. परिणामी दैनंदिन गरजेच्या वस्तू, भाजीपाला, फळे आणि अन्नधान्य महाग होईल. देशातील महागाईचा दर वाढेल, ज्यामुळे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला व्याजदर कमी करणे कठीण होईल. म्हणजेच गृहकर्ज आणि वाहन कर्जाचे हप्ते स्वस्त होण्याची आशा मावळेल. युद्धाच्या बातम्यांमुळे जागतिक गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. परदेशी गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारातून आपले पैसे काढून घेत आहेत, ज्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये मोठी घसरण पाहायला मिळत आहे. जेव्हा जगात युद्ध किंवा अस्थिरता असते, तेव्हा गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे वळतात. यामुळे येत्या काळात भारतात सोन्याचे आणि चांदीचे दर आणखी गगनाला भिडण्याची शक्यता आहे.

---------

### ग्रामस्थांचा कला केंद्रात राडा,

कारणावरून बेदम मारहाण केली. ही वार्ता राजापूर गावात वाऱ्यासारखी पसरली आणि पाहता पाहता शेकडो ग्रामस्थ लाठ्या-काठ्या घेऊन कला केंद्रावर धडकले. आक्रमक झालेल्या जमावाने कला केंद्राचा मुख्य लोखंडी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. आक्रमक गावकऱ्यांनी कला केंद्रातील फर्निचर, महागडे सीसीटीव्ही कॅमेरे, टेबल आणि विद्युत उपकरणांची अक्षरशः विल्हेवाट लावली. एवढेच नाही तर पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या १० ते १२ चारचाकी वाहनांच्या काचा फोडून लाखो रुपयांचे नुकसान केले. या दगडफेकीत ३ ते ४ जण जखमी झाले आहेत. तसेच या घटनेवेळी बाहेरील शौकिनांचीही मोठी पळापळ झाली. दरम्यान, हे कला केंद्र अनधिकृत असून ते तातडीने बंद व्हावे, अशी मागणी आडूळ परिसरातील सुमारे २० गावांतील ग्रामस्थांनी वारंवार केली होती. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून दाद मिळत नसल्यानेच हा जनआक्रोश उसळल्याची चर्चा परिसरात आहे. पाचोड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली असून, गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------

### राज्यसभेच्या सातही जागांवर उमेदवार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी राज्य सुकाणू समितीची नुकतीच बैठक झाली. त्यात निश्चित झालेल्या नावांबाबत भाजपाध्यक्ष नितीन नवीन यांच्याशी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व राज्यातील नेते चर्चा करण्याची शक्यता आहे. येत्या एक-दोन दिवसांत भाजपचे राज्यातील उमेदवार जाहीर होऊ शकतात. परराष्ट्रमंत्री एस जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, आठवले या वरिष्ठ मंत्र्यांचे अपवाद वगळता भाजप राज्यसभेसाठी एका नेत्याला दुसऱ्यांदा संधी देत नाही. किंबहुना महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशासारख्या राज्यांबाबत पक्षाने धोरण म्हणूनच तसे ठरविल्याचे पूर्वीची उदाहरणे सांगतात. माजी अर्थ राज्यमंत्री भागवत कराड याला अपवाद ठरणार का, असा प्रश्न यावेळी आहे. कराड, रावसाहेब दानवे व धैर्यशील पाटील यांना राज्यात काम करण्यास सांगितले जाऊ शकते, असे सूत्रांनी सांगितले. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे व राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचीही नावे चर्चेत आहेत. राज्यसभेच्या सात जागांपैकी भाजप चार, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) एक व शिवसेना एक असे सूत्र महायुतीत निश्चित झाले आहे. सातव्या जागेसाठी मविआमधील वाद कायम असताना, या जागेवरही उमेदवार उतरविण्याची सूचना थेट गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून आल्याचे समजते. भाजपला सातवा उमेदवार निवडून आणायचा असेल, तर २० मते अतिरिक्त आणावी लागतील व ते साध्य करण्याची तयारी महायुतीने केल्याचे समजते.

**मविआतील दुफळी**

महाविकास आघाडीचा एक उमेदवार जिंकायचा असेल, तर तिन्ही पक्षांनी एकत्र येऊन एक उमेदवार देण्याचा पर्याय प्रत्यक्षात येण्याची चिन्हे नसल्याचे भाजप सूत्रांना वाटते. काँग्रेस आणि उबाठा शिवसेना पक्ष हे दोन पक्ष एकत्र आले, तरी त्यांच्याकडे काठावरच्या बहुमतासाठीची ३६ मते होतात. राज्यसभेची निवडणूक काही दिवसांवर आल्यामुळे आता राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सत्ताधारी भाजप या निवडणुका अत्यंत चुरशीने लढवत असल्याने त्या रंगतदार होतात.

-------------

### महिलांच्या लैंगिक छळासंबंधी

राज्यभरातील दौऱ्यांदरम्यान अनेक ठिकाणी गंभीर त्रुटी आढळून आल्याचे चाकणकर यांनी नमूद केले. काही कार्यालयांत समितीच स्थापन नाही, काही ठिकाणी ती केवळ कागदोपत्री असून प्रत्यक्षात कार्यरत नाही. याशिवाय समिती सदस्यांना प्रशिक्षणाचा अभाव, वार्षिक अहवाल न सादर करणे आणि दर्शनी भागात माहिती फलक नसणे अशा बाबीही निदर्शनास आल्या आहेत. सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी सदर परीक्षण पूर्ण करून ३० दिवसांच्या आत अहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे सादर करावा, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. या संदर्भात चाकणकर म्हणाल्या की, सर्व कार्यालयांमध्ये पॉश ऑडिट अनिवार्य करण्याची मागणी आयोगाने शासनाकडे केली होती. शासनाने २२ ऑगस्ट २०२५ रोजी यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेत शासन निर्णय जारी केला आहे. राज्यातील मोठ्या प्रमाणावर बाहेर पडणाऱ्या 'वर्किंग वुमन फोर्स'ला सुरक्षित, निर्भय आणि पोषक वातावरण मिळते आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

------------

### देशात खग्रास तर राज्यात

अल्प ग्रहण दिसेल. हे ग्रहण पाकिस्तान, अफगाणिस्तान पासून भारतासहीत पुर्वेकडील देश आष्ट्रेलिया, आशिया, अमेरिका येथे दिसेल. यापूर्वी जगातील काही स्थळी १७ फेब्रुवारीला कंकणाकृती सूर्यग्रहण दिसले होते तसेच पुढे १२ ऑगस्ट रोजी खग्रास सूर्यग्रहण तर २८ ऑगस्ट रोजी खंडग्रास चंद्रग्रहण दिसणार आहे. महाराष्ट्रातून केवळ १ तास ३५ मिनिटेच अल्प ग्रहण दिसेल आणि हे ग्रहण पूर्व क्षितिजावर असल्याने फारसे सुंदर दिसणार नाही. घरावरून किंवा टेकडीवरून हे ग्रहण थोडे चांगले दिसेल. ग्रहण दुर्बिणीने फारसे चांगले दिसत नसल्याने साध्या डोळ्याने ते पाहिले पाहिजे. ग्रहणे ही वैज्ञानिक घटना असल्यामुळे त्यांचा वैज्ञानिक दृष्ट्या निरीक्षण आणि अभ्यास केला पाहिजे, असे प्रा.सुरेश चोपणे यांनी सांगितले आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. २ मार्च २०२६


## थोडक्यात



माजलगाव:- येथील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.मुजीब सौदागर यांचा मुलगा डॉक्टर अदिल मुजीब सौदागर यांचा हैदराबाद येथे एम.डी.मेडसीन ला नंबर लागल्याबदल डॉक्टर मुजीब सौदागर व डॉक्टर अदिल सौदागर, अब्दुल बाखी सौदागर यांचा सत्कार करुन शुभेच्छा देताना, सेवानिवृत्त वनाधिकारी शेख मज्नीद, शेतकरी संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष भाई गंगाभिषण थावरे, ज्येष्ठ पत्रकार महेंद्र मस्के, पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे, प्रकाश उजगरे, राजेभाऊ शेजुळ,चाँद पटेल, प्रदिप कर्डिले व हानुमंत कर्डिले.



एकदिवसीय आई महोत्सव निमित्त ह.भ.प.मेंगडे महाराज यांचे सुश्राव्य असं कीर्तन झाले. याप्रसंगी नवनाथ शिराळे, बाबुराव परळकर, पांडुरंग रांजवन, ज्ञानेश्वर डाके इत्यादी भक्त मंडळी दिसत आहेत.

## चौसाळा येथे एस टी महामंडळाच्या सवलती कार्ड नोंदणीला शुभारंभ



चौसाळा । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून प्रवासात सवलत मिळवण्यासाठी आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड एन सी एम सी प्रणाली लागू करण्यात येत आहे सवलतीच्या लाभ घेण्याचा प्रवाशांसाठी हे कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे चौसाळा येथे सदर छउचउ कार्डच्या नोंदणी करण्याचा शुभारंभ येथील एसटी महामंडळाचे वाहतूक नियंत्रक श्री बबन येडे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्थानिक पत्रकार एन टी वाघमारे यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला या चौसाळा परिसरातील एकूण ४० लोकांनी आतापर्यंत नोंदणी केलेली आहे तर अंगठा न बसल्यामुळे अनेक नागरिकांना नोंदणी करता वापस परतावे लागले तरी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांसाठी इतर मार्गाने नोंदणी करून ज्या ज्येष्ठ नागरिकांचे ठसे उमटत नाहीत अशा नागरिकांसाठी वेगळ्या पद्धतीने मार्ग काढावा अशी मागणी प्रवाशातून केली जात आहे तर या सवलती कार्डाचा चौसाळा व चौसाळा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान एसटी महामंडळाचे छउचउ चे अधिकृत नोंदणी प्रतिनिधी विकास सर्वज्ञ यांनी केले.

## स्वच्छ बीड- सुंदर बीडसाठी निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना देणार साथ

बीड । प्रतिनिधी

दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना जिल्हा शाखा बीड च्या पदाधिकाऱ्यांनी नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी शैलेश फडसे कार्यालयामध्ये भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सदरील प्रसंगी स्वच्छ बीड सुंदर बीडचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी माननीय मुख्याधिकारी व नवनिर्वाचित सर्व सन्माननीय पदाधिकारी यांना संघटनेचा सदैव सक्रिय सहभाग आणि पाठिंबा राहील याबाबत आश्वासित केले

. सदरील प्रसंगी बीड शहरामध्ये सध्या भेडसावणाऱ्या विविध समस्यांविषयी चर्चा केली त्यामध्ये प्रामुख्याने शहरातील कचरा व्यवस्थापन सांडपाण्याचे व्यवस्थापन व शहराला नियमित पाणीपुरवठा या विषयावरती माननीय मुख्याधिकारी यांच्यासोबत चर्चा करण्यात आली, संघटनेच्या वतीने सदरील समस्या सोडवण्यासाठी संघटनेचे प्रशासकीय



अधिकारी व तांत्रिक अधिकारी नगर परिषदेस विनामूल्य सेवा देतील याबाबत त्यांना अवगत करण्यात आले. सद्यस्थितीत नगरपरिषद कर्मचारी करत असलेल्या शहर स्वच्छतेबाबत असणाऱ्या अनेक त्रुटी माननीय मुख्याधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्या, त्यांना प्रत्यक्ष रस्त्यावरील व मोकळ्या प्लॉटमधील कचऱ्यांच्या ठिकाणचे फोटो आणि व्हिडिओ दाखवण्यात आले. त्यामध्ये गोपाळा अपार्टमेंट मध्ये सांडपाण्याचा निचरा थांबल्यामुळे जवळपास दीडशे लोकांच्या आरोग्य धोक्यात आले आहे याबाबतही प्रत्यक्ष व्हिडिओ आणि फोटो दाखवण्यात आले. सदरील बाबतींत मुख्य अधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना बोलावून वरील प्रश्न सोडवण्यासाठी सूचना दिल्या. याप्रसंगी शहराला पंधरा दिवसाऐवजी सात दिवसांनी पाणीपुरवठा कसा करता येईल याबाबत तांत्रिक समिती नेमणूक योग्य कारवाई करण्यासाठी विनंती करण्यात आली, हा प्रश्न सोडवण्यासाठी संघटनेचे सभासद असणारे सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता तसेच कनिष्ठ अभियंता ही आपली सेवा विनामूल्य देतील, नगरपरिषदेने या सेवेचा फायदा घ्यावा अशी विनंती करण्यात आली.

याप्रसंगी प्रामुख्याने शहरातील कचरा व्यवस्थापनाबाबत सखोल चर्चा करण्यात आली, मुख्याधिकारी यांनी त्यांच्या स्टाफला जो कोणी रस्त्यावरती व मोकळ्या प्लॉटमध्ये कचरा टाकतील त्यांच्यावरती नगरपरिषद नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी असे आदेश दिले, तेव्हा संघटनेच्या वतीने त्यांना प्रत्येक वार्ड मध्ये कचरा गोळा करण्यासाठी नेमण्यात आलेल्या घंटागाडी या वेळेवर येत नाहीत, वार्ड क्रमांक पंधरा मध्ये तर केवळ आठ दिवसात एकच वेळेस घंटागाडी कचरा गोळा करण्यासाठी येथे आणि तीही वेळेवर येत नाही त्यामुळे संबंधित वार्डमधील नागरिकांना ना विलाजाने कचरा हा मोकळ्या प्लॉटमध्ये किंवा रस्त्यावर टाकण्याशिवाय पर्याय राहत नाही त्यामुळे माननीय मुख्य अधिकारी यांना कचरा गोळा करणाऱ्या घंटागाडीच्या स्टाफला सकाळी ठराविक वेळेवरती प्रत्येक कॉलनीमध्ये जाण्यासाठी टाईम टेबल आखून देण्यात यावा जेणेकरून नागरिकांना साठवलेला कचरा हा नियमित वेळेवरती घंटागाडी मध्ये टाकता येईल अशी विनंती करण्यात आली. याप्रसंगी संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक आदरणीय डी. जी.तांदळे, श्री प्रल्हाद जावळे, संघटनेचे अध्यक्ष इंजि. जे. एन. भोरे, सचिव इंजि.कांचन गायकवाड, कार्याध्यक्ष गौतम चोपडे, प्रसिद्धी प्रमुख तुकाराम पवार -ठाकूर, सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य अधिकारी श्री चव्हाण साहेब, श्री बागडे साहेब व इतर पदाधिकारी उपस्थित होते. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत माननीय मुख्याधिकारी यांनी अतिशय मनमोकळेपणाने विचार विनिमय करून त्यांच्या भावना जाणून घेतल्या व संघटनेने सुचवलेले उपाययोजना अमलात आणण्यासाठी प्रत्यक्ष कारवाई करण्यासाठी अस्वस्थ केले, याप्रसंगी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी संघटना ही स्वच्छ बीड सुंदर बीडचे स्वप्न साकार करण्यासाठी सदैव आपल्या पाठीशी खंबीर व सक्रियपणे उभा आहे याबाबत लेखी पाठिंबा दिला.

## भारतीय संस्कृती ही वैश्विक आणि चिरंतन संस्कृती आहे- राष्ट्रीय विचारवंत योगेश सोमण

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात आयोजित प. पू. गोळवलकर गुरुजी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प 'भारतीय संस्कृतीवरील आघात' या विषयावर बोलताना योगेशजी सोमण (राष्ट्रीय विचारवंत तथा प्रसिद्ध सिने अभिनेते, मुंबई) बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, ब्रिटीशांनी सर्व प्रथम ऐतिहासिक व शौर्याचे प्रतिक असलेल्या गड- किल्ले उध्वस्त करून येथील संस्कृती चे पध्दतशीर खच्चीकरण केले, आज भारतीय संस्कृती वर आधूनिक तंत्रज्ञान, मोबाईल, चित्रपट, मालिका यांचा फार मोठा आघात सध्याच्या परिस्थितीत होत आहे परंतु समाजामध्ये आजही असे घटक आहेत जे पारंपरिक, वैचारिक कृतीतून संस्कृती चे जतन केले जात आहे. भारतीय संस्कृती ही अनादी काळापासूनची आहे. भारतीय संस्कृती ही वैश्विक व चिरंतन संस्कृती आहे.



या व्याख्यानमालेच्या पहिल्या पुष्पाची सुरुवात दीपप्रज्वलन व भारत माता, प. पू. गोळवलकर गुरुजी यांचे पूजन करून झाली. या सत्राचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष अभय कोकड तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या सत्राचे अध्यक्षीय समारोप करताना डॉ सुरेंद्र आलुरकर यांनी सांगितले की, भारतीय संस्कृती वर गेल्या अनेक शतकांपासून विविध आघात झाले आहे तरी भारतीय संस्कृती आज जगात पूजनीय आहे.

प्रास्ताविक व्याख्यानमाला समितीचे कार्यवाह प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी यांनी केले. आभार प्रा. बाळासाहेब परळकर यांनी मानले तर सुत्रसंचालन प्रा. डॉ. रमेश गटकळ यांनी केले, वैयक्तिक पद्य श्रीमती नादमयी पोरे (कुलकर्णी) यांनी सांगितले. या पुष्पाची सांगता भारत मातेच्या आरतीने झाली. भारत माता आरती चैतन्य आहेर, कुणाल कुलकर्णी संगीत विभागाच्या चमुने सादर केली. यावेळी सर्व स्थानिक संस्था सभासद, माजलगाव शहरातील डॉक्टर, वकिल,पत्रकार, शैक्षणिक संकुलाचे माजी विद्यार्थी, पालक,महिला, पुरुष, नागरिक, सेवानिवृत्त शिक्षक तसेच माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमती भारती,सीबीएसई च्या श्रीमती वंदना मिटकरी, शिशुविहार च्या श्रीमती वर्षा कुलकर्णी,सर्व, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाच्या

करून द्यावी. संवेदनशील भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.बिबट्यांच्या हालचालीबाबत इशारा देणारी यंत्रणा उपलब्ध करावी.तसेच बिबट्या आणि अन्य वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या कुटुंबांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या शासन निर्णयात स्पष्टता आणून बाधित कुटुंबांचे पुनर्वसन करण्याची मागणीही त्यांनी केली.शेती ही राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि ग्रामीण भागातील नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक असल्याचे आमदार सुरेश धस यांनी अधोरेखित केले.

### शासनाने शिक्षण संस्था

हा आदेश शासनाने पारित केला आहे. त्या आदेशाला संस्थाचालकांचा विरोध असून जेव्हा परीक्षा संदर्भात बैठका घेतल्या जातात. त्या बैठकीत केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व प्राचार्य उपस्थित राहतात. तिथे संस्थाचालकांना बोलवले जात नाही. परीक्षेशी संस्थाचालकांचा काही एक संबंध नसून सदरील परीक्षेत परीक्षार्थींकडून चुका घडतात. आणि त्याची शिक्षा संस्थाचालकांना हा तुघलकीय आदेश तात्काळ रद्द करावा. बरोबर शासनाने संस्थाचालकांना सन्मानाने वागवावे. येत्या २८ मार्च २०२६ ला राज्य शिक्षण संस्था महामंडळाची कार्यकारिणी या विरोधात शासनाकडे निवेदन देऊन संस्थाचालकांची बाजू मांडणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन देण्यात येणार आहे. राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या कार्यकारणी सदस्य प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी प्रसिद्धीला दिले आहे. यासाठी संस्थाचालकांनी राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या भूमिकेला समर्थन द्यावे असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### 'मी तुमची सावित्रीबाई

सादरीकरणातून सावित्रीबाईंचा जीवनसंघर्ष व समाजप्रबोधनाचा संदेश जिवंत करणार आहेत. यासोबतच महिलांच्या मनोरंजनासाठी व कलागुणांना वाव देण्यासाठी 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा, सन्मान महिलांचा' या विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेद्वारे महिलांना विविध खेळांमध्ये सहभागी होत आकर्षक पैठणी जिंकण्याची संधी मिळणार आहे. परिसरातील सर्व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### ठोस आर्थिक धोरणावरच

तसेच केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी (कार्यवाह- प पू गोळवलकर गुरुजी व्याख्यानमाला समिती) इत्यादी उपस्थित होते. या सत्राचे अध्यक्षीय समारोप सत्यनारायण लोहिया यांनी केले, आभार पर्यवेक्षक सदाशिव ढगे सर यांनी व्यक्त केले, वैयक्तिक पद्य कुणाल कुलकर्णी यांनी सांगितले, सत्राची सांगता पसायदानाने झाली. पसायदान कु. श्रेया शेटे व कु श्रेया ठोंगे यांनी सांगितले. तर सुत्रसंचालन श्रीमती सुनंदा खांडेकर यांनी केले.यावेळी सर्व स्थानिक संस्था सभासद, माजलगाव शहरातील डॉक्टर, वकील, पत्रकार, शैक्षणिक संकुलाचे माजी विद्यार्थी, महिला- पुरुष पालक, सेवानिवृत्त शिक्षक, तसेच माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमती भारती, सीबीएसई च्या श्रीमती वंदना मिटकरी, शिशुविहार च्या श्रीमती वर्षा कुलकर्णी, सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### विक्रीसाठी जात असलेला

चारचाकी गाडी व गांज्या एकुण १३,७०,८६० रुपयाचा गांज्या व चारचाकी वाहन जप्त करण्यात आले असुन आरोपी प्रतीम राम तरकसे, वय २७ वर्षे.रा. आडस ता.केज जि.बीड याचे सह त्याचे साथीदार २. प्रतिक भगवान पाटोले, ३. अजय पाटोळे, दोन्ही रा. आसरडोह ता.धारुर जि.बीड ४. अजय देवकर रा. अंदोरा ता. कळंब जि. धाराशिव यांचेवर पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे यांचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं. ८३/२०२६ कलम २०, ८(सी) गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधि. १९८५ कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर हे करीत आहे. सदरील कामगिरी हि, नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, श्री. ऋषिकेश शिंदे, सहा. पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजी बंटेवाड पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, शरद जोगदंड पोलीस निरीक्षक अंबाजोगाई शहर, पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस उपनिरीक्षक शिंदे, पोलीस हवालदार मारुती कांबळे, रामचंद्र केकाण, सुनिल अलगट, गोविंद भताने, सचिन आंधळे, अतुल हराळे, व पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर येथील पोलीस हवालदार वडकर, गायकवाड, तेजेस वाहुळे, पोलीस अंमलदार चादर गायकवाड, आय बाईक अंमलदार खरटमोल यांनी मिळुन केली आहे.

### सुंदरराव सोळंके

दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी संशोधन आणि नवोपक्रमासाठी सतत सजग राहावे. यावेळी डॉ. सुहास गवळी यांनी सी.व्ही. रमण यांच्या कार्यावर सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ गणेश मोकासरे यांनी केले तर आभार डॉ नितीन ढवळे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी- विद्यार्थिनी,प्राध्यापक उपस्थित होते.

### उमेदीच्या चंकलंबा प्रभाग

बुजून वंचित ठेवले आहे, प्रभाग समन्वयक यांनी गांवो गांवी फिरुन महीलांना प्रवाहात आणण्यासाठी शासनाने वेतन देवुन समन्वयक यांनी नियुक्ती केली,आहे, त्यासाठी प्रत्येक गांवात जावुन मशाल फेरी काढणे, गांव नकाश तयार करणे, द्रारिद्र रेषा खालील कुंटुबाचा सर्वह करणे, महीलाचा सामाजिक कामात सहभाग करत महिला सक्षमीकरण करण्याचा मुख्य उद्देश आसनाही, तो साध्य न करता प्रभाग समन्वयक यांच्या हलगर्जीपणा केल्यामुळे चंकलंबा प्रभाग गांवे निधी असुन वंचित ठेवण्याचे काम प्रभाग समन्वयक यांनी केली तरी मुख्य कार्यकारी अधिकारी जि, प, बीड यांनी दखल घेवुन प्रभाग समन्वयक यांचा वर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### बीड नगरपालिकेच्या कॉम्प्लेक्स

आणि कोणाच्या फायद्यासाठी? शासन मान्यतेचे कागद कुठे आहेत?

गाळे विक्री व भाड्याने देणाऱ्यांवर कारवाई का नाही? बेकायदेशीर स्ट्रक्चर बदलांवर अजूनही कारवाई का टळतेय? ही केवळ प्रशासकीय चूक नसून सार्वजनिक मालमत्तेचा योजनाबद्ध गैरवापर असल्याचा संशय बळावत आहे. जिल्हा प्रशासन, नगरविकास विभाग व राज्य शासनाने तातडीने चौकशी न केल्यास, हा विषय न्यायालयात जाणे अटळ असल्याचे संकेत नागरिकांकडून दिले जात आहेत.

## सिमरी पारगाव येथे शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा



पात्रूड । प्रतिनिधी

सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती, सिमरी पारगाव यांच्या वतीने दिनांक २८ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. सकाळी ठीक ७ वाजता पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या थाटामाटात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात, भगव्या ध्वजांच्या साक्षीने निघालेल्या या पालखी सोहळ्याने संपूर्ण गाव शिवमय झाले होते. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद घेतला.

पालखी सोहळ्यानंतर सकाळी ९ वाजता भाग्यश्रीताई मोहिते पाटील यांचे प्रेरणादायी व्याख्यान संपन्न झाले. आपल्या व्याख्यानातून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत तरुणांना राष्ट्रसेवा, चारित्र्य आणि स्वाभिमानाचे महत्त्व पटवून दिले. उपस्थित नागरिकांनी व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दिवसभर गावामध्ये शिवजन्मोत्सवाचा उत्साह पाहायला मिळाला. रांगोळ्या, सजावट, भगवे झेंडे आणि घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून गेला होता. सायंकाळी ६ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व शिवजन्मोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ मोठ्या जल्लोषात पार पडले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गट अधिकारी, माजलगाव तसेच इतर मान्यवर शिक्षक उपस्थित होते. तसेच गावातील तंटामुक्ती अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनीही प्रमुख पाहुण्यांची भूमिका बजावली. मान्यवरांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थ्यांचे सादरीकरण आणि विविध उपक्रमांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. संपूर्ण कार्यक्रम शांततेत, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## महादेव भुसारे यांचा सेवानिवृत्ती निमित्त गौरव सोहळा

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील डॉ. सोनाजीराव रांजवन माध्यमिक विद्यालयाचे जेष्ठ क्रीडाशिक्षक महादेव भुसारे यांचे नियत वयोमानानुसार काल (२८ फेब्रु) शनिवारी सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ व गौरव सोहळा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

केज तालुक्यातील डोणगाव येथील रहिवासी महादेव तुकाराम भुसारे यांनी सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाच्या दिंद्रुड, वडवणी, टाकरवन येथील विविध शाळांमध्ये गेल्या ३१ वर्ष क्रीडाशिक्षक व इंग्रजीचे ज्ञानार्जन केले. त्यांच्या कार्यकाळात अनेक विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर क्रीडा स्पर्धांमध्ये स्पर्धक राहिले आहेत. दिंद्रुड येथील शाळेत सर्वाधिक काळ भुसारे यांनी ज्ञानदानाचे कार्य केले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त शनिवारी येथील शाळेत महादेव भुसारे यांचा सपत्निक परिवारासह सेवा गौरव करत निरोप देण्यात आला. यावेळी भुसारे सर यांची पत्नी नीलावती, आई नागरबाई, मुलगा मनोज, महेश, सुन सीमा, दिप्ती, भाऊ, भावजई रत्नमाला विष्णु भुसारे व इतर नातेवाईक श्रीहरी दोडके (फौजी), मनोहर सपाटे, मेघराज सपाटे, बहीण संगीता सपाटे या सर्व परिवारासमवेत भुसारे सरांचा दिंद्रुड ग्रामस्थ, आप्तेष्ट, मित्र परिवार, शिक्षकवृंद, माजी विद्यार्थ्यांनी गौरव केला. भुसारे यांनी क्रिडा व शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान, त्यांच्या अनेक आठवणींना उजाळा शाळेतील शिक्षक, माजी विद्यार्थी, आप्तेष्ट आणि मित्र मंडळींनी दिला. ते एक आदर्श व विद्यार्थीप्रिय शिक्षक असल्याचे उद्गार यावेळी मान्यवरांनी मांडले. सत्काराला उत्तर देताना महादेव भुसारे यांचा कंठ दाटून आला



होता. त्यामुळे काही वेळ त्यांना शब्द सुचेनासे झाले. तसेच जीवनात त्यांनी केलेले क्रिडा व ज्ञानदानाचे कार्य विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशामुळे फळास आले याचे समाधान व्यक्त केले. याप्रसंगी सिंदफणा प्रसारक मंडळाचे मुख्याध्यापक, माजी मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक वचिष्ठ चव्हाण यांनी तर सूत्रसंचालन सहशिक्षक संजय बारवकर यांनी तर आभार सहशिक्षक सुधीर ठोंबरे यांनी मानले. शाळेच्या सर्व शिक्षकवृंद, कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमात परिश्रम घेतले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्यात युवासेनेच्या ११ शाखांचा शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, युवासेना मुख्य सचिव राहुल लोंढे, युवासेना सचिव (महाराष्ट्र) किरण साळी तसेच युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तालुक्यात युवासेनेच्या ११ शाखांचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन झालेल्या शाखांमध्ये राजपिंपरी,या वाघदरातांडा, महादेव तांडा, देवपिंपरी, भाट अंतरवाली फाटा, आहेर वस्ती, खळेगाव फाटा, ब्रह्मगाव, ब्रह्मगाव फाटा, चव्हाणवाडी व माटेगाव या गावांचा समावेश असून ही सर्व गावे तालुका गेवराई, जिल्हा बीड येथील आहेत. या कार्यक्रमाचे संयोजक युवासेना तालुका प्रमुख बबन (आप्पा) मोघे होते. उद्घाटनासाठी प्रमुख उपस्थिती मराठवाडा निरीक्षक श्री.अविनाश



### युवासेनेच्या माध्यमातून शिवसेनेची ताकद वाढली

भाऊ जाधव व

शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत (आप्पा) नवले व युवा सेना जिल्हाप्रमुख अजय भैय्या सुरवसे, युवा सेना जिल्हाप्रमुख सुमित भैया कोळपे युवा सेना तालुकाप्रमुख बबन आप्पा मोघे शिवसेना उपजिल्हाप्रमुख नारायण राव शिंदे शिवसेना शहरप्रमुख मुकेश अण्णा महाजन शिवसेना ज्येष्ठ नेते लिंबाजी मामा जाधव शिवसेना जिल्हा संघटक विक्रम भोसले शिवसेना विधानसभा प्रमुख नवनाथ गवते युवासेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे युवा सेना शहरप्रमुख गणेश पवार युवा सेना धोंडराई सर्कल प्रमुख अंकुशराव मोरे युवा नेते पिंटू भैया पानखडे गणेशराव चव्हाण विठ्ठलराव पवार तात्यासाहेब चव्हाण सर्व शाखांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, युवा सेना शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते धोंडराई सर्कल मधल्या या गावांमध्ये, राजप्रिंप्री, महादेव तांडा, माटेगाव, देवप्रिंप्री, ब्रह्मगाव, भट अतंरवाली, वाघदरा तांडा, खळेगाव, आहेर वस्ती, चव्हाणवाडी अशा अनेक गावांमध्ये शाखांचे उद्घाटन पार पडले. यांच्यासह शिवसैनिक, युवासैनिक, शाखाप्रमुख, पदाधिकारी, गावातील नागरिक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भाषणात चंद्रकांत आप्पा नवले यांनी शिवसेना, युवासेना, शेतकरी सेना आणि वारकरी संप्रदाय हे आपल्या कुटुंबाचा भाग असल्याचे सांगून हे संघटनात्मक कुटुंब अधिक व्यापक कसे करता येईल यासाठी शिवसैनिकांनी प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन केले. या नव्या शाखांमुळे गेवराई तालुक्यात युवासेनेच्या माध्यमातून शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक बळकट झाल्याची भावना पदाधिकार्यांनी व्यक्त केली.

## अर्जुन शेळके यांचा सेवापुर्ती सोहळा

मादळमोही । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील धारंवंटा रहिवासी सध्या वारोळा ता, माजलगाव येथे कार्यरत असणारे शिक्षक अर्जुन शेकळे हे आठ्ठाविस वर्ष सेवा करून सेवा निवृत झाले, प्राथमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा वारोळा येथे सेवापुर्ती सोहळा संस्थाचालक बाबुराव जाधव शिक्षक विद्यार्थी यांच्या उपस्थित संपन्न झाला,



या सेवापुर्ती सोहोळ्यात बोलताना शेळके सर म्हाणाले कि, शाळेवर सेवा करतांना जे मला प्रेम व सन्मान मिळाला तो पुढील आयुष्यात कधीच त्यांचा विसर पडणार नाही, सेवा काळातील आयुष्यात अनेक विद्यार्थी घडविण्याचा हा योग म्हणजे माझे मोठे या जन्माचा पुण्याची शिदोरी माझ्या कायमस्वरूपी बरोबर राहील, या सेवा काळात संस्थाचालक सह सर्व शिक्षक, विद्यार्थी यांच्या मनात मी घर राहु शकलो, त्यामुळे उर उरीत आयुष्यात गर्वानी व अभिमानाने मी सर्वांना सांगेल, ही आयुष्यातील माझा मी मोठी मिळकत समजतो, अनेक विद्यार्थी घडवून आर्दश विद्यार्थी घडविण्याचा आनंद जो मी आज अनभवतोय तो शब्दांत मी सांगू शकत नाही, यावेळी संस्थाचालक यांनी सेवानिवृत्त प्रमाणपत्र त्यांना दिले, यावेळी आश्रम शाळा तील विद्यार्थी, शिक्षक, पाहुणे हे उपस्थित होते, या सेवापुर्ती सोहळ्यास अनेकांनी त्यांचा सत्कार केला.

cmyk

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
सोमवार दि. २ मार्च २०२६


# महिलांच्या एकोप्यानेच गावांचा शाश्वत विकास शक्य संजय परमार

## पठाण मांडवा येथे फलोत्पादक शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्टकडून ठिबक संचांचे मोफत वितरण


परळी

राज्य व देशाच्या प्रगतीत महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून आज त्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत आहेत. उद्योग, व्यापार, नोकरी यांसोबतच आता कृषी क्षेत्रातही महिलांनी सक्रिय सहभाग घेत यशोगाथा निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. गावांच्या शाश्वत विकासासाठी महिलांनी एकोपा निर्माण करून गटांची स्थापना करावी आणि गटशेतीच्या माध्यमातून आर्थिक उन्नती साधावी, असे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे ट्रस्टी संजय परमार यांनी केले. ते अंबाजोगाई तालुक्यातील पठाण मांडवा येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमात फलोत्पादक शेतकऱ्यांना ग्लोबल विकास ट्रस्ट व रोटरी क्लब ऑफ दिल्ली प्रीमियरच्या वतीने मोफत ठिबक सिंचन संचांचे वितरण करण्यात आले.



ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. पठाण मांडवा येथे ३५ पेक्षा अधिक शेतकरी नव्याने केळी लागवडीकडे वळले असून त्यांना मोफत मार्गदर्शनासोबतच आवश्यक तांत्रिक व आर्थिक सहाय्य दिले जात आहे. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठीच ठिबक सिंचन साहित्याचे वितरण करण्यात आले. याशिवाय मोतीलाल ओसवाल यांच्या सहकार्याने मार्फत इच्छुक शेतकऱ्यांना कर्जाच्या स्वरूपात आर्थिक मदतही उपलब्ध करून दिली जात आहे. पठाण मांडवा येथील हनुमान मंदिरात पार पडलेल्या या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे ट्रस्टी संजय परमार, मुख्य लेखापाल श्याम पम्मी, तालुका कृषी अधिकारी विजय पवार, कृषी सहाय्यक बालाजी काळे, सरपंच गणेश रुद्राक्ष आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सत्यप्रेम नरवणे यांनी केले, तर शिवलिंग रुद्राक्ष यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची रूपरेषा आणि ट्रस्टच्या विविध योजनांची माहिती दिली. गावांच्या विकासासाठी महिलांचा सहभाग, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर आणि संस्थात्मक सहकार्य या तिन्ही गोष्टींचा संगम झाल्यास ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साध्य होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. ग्रामीण भागातील शेतकरी महिलांचा आर्थिक उत्कर्ष साधण्यासाठी त्यांना ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाणार आहे. पुढे येऊन गटशेतीच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण संकल्पना राबवणाऱ्या महिला बचत गटांना तांत्रिक प्रशिक्षण तसेच योग्य मार्गदर्शन दिले जाईल. यासाठी शासन आणि प्रशासनासोबत योग्य समन्वय साधला जाईल आणि विकासाच्या संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यात येईल असेही संजय परमार म्हणाले. आगामी वर्ष हे महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाचे वर्ष म्हणून त्यादृष्टीने पावले उचलली जाणार असल्याचेही त्यांनी उपस्थितांना सांगितले.

## उसाच्या खोडव्यात उन्हाळी मूग पिकाचे आंतरपीक




डिसेंबर २०२५ मध्ये कापून गेलेल्या ऊस पिकाच्या खोडव्यात उरलेल्या पाचटची ट्रॅक्टर संचलित यंत्राद्वारा कुट्टी करून उन्हाळ्यात मूग पिकाचे आंतरपीक घेऊन उत्पादन वाढवण्याचे तंत्रज्ञान विकसित झाले आहे.

ऊस पिकात डाळवर्गीय मूग पिक आंतरपीक घेऊन मुख्य ऊस पिकाची अधिकतम उत्पादकता कसे वाढवता येईल आणि सोबतच जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. ऊस पिकात पाण्याचा आणि रासायनिक खतांचा अतिवापर होत असल्याने पश्चिम महाराष्ट्रातील जमिनी क्षारपट होत असुन जमिनीचा सामू वाढत आहे. प्रगतशील शेतकरी शेतजमिनीत मागील दोन वर्षापासून हा प्रयोग घेत आहे. ऊस पिकाच्या खोडव्यात कडधान्य पिकाची घन पद्धतीने जानेवारी महिन्यात लागवड करून मुख्य पीक उसाचे विक्रमी उत्पादन आणि मूग पिकाचे दुय्यम उत्पन्न मागील प्रयोगातून मिळालेले आहे. पाण्याचा अतिरेक वापर आणि रासायनिक खतांच्या बेसुमार वापरामुळे जमिनीचा पोत खराब होऊन उत्पादकता कमी होत चालली आहे.

अशा स्थितीत जमिनीची सुपीकता वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. रासायनिक खतांचा वारेमाप वापर कमी होणे गरजेचे असून, पिकांची फेरपालट होणे आवश्यक आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ऊस पिकात मूग पिकाचे आंतरपीक घेऊन उसाची उत्पादकता वाढवून दाखवली आहे. सोबत जमिनीचा पोत सुधारण्यास मदत झाल्याचे त्याचे निष्कर्ष आहेत. ऊस पीक कापणी नंतर त्याठिकाणी राहिलेल्या उसाच्या पाचटची ट्रॅक्टर संचलित यंत्राद्वारा कुट्टी केली. ट्रॅक्टरच्या सहाय्याने उसाच्या दोन्ही बाजूने बगला फोडून, उसाचे बुडखे कट करून त्यामध्ये कमी प्रमाणात रासायनिक खत वापरून मूग पिकाच्या फुले सुवर्ण जातीची घण पद्धतीने पेरणी करण्यात येते. मूग बियाणे हेक्टरी २० किलो वापरण्यात आले आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ द्वारा निर्मित आणि केंद्रीय जात समिती द्वारा २०२४ मध्ये शिफारशीत फुले सुवर्ण नावाची मूग पिकाची जात वापरण्यामागे उद्देश असा आहे की ही जात फक्त ५५ दिवसात काढणीस येते, एकाच वेळेस पक्वतेस येते, भुरी रोगास प्रतिकारक्षम आणि कोणत्याही वातावरणात तग धरण्याची क्षमता ह्या जातीत आहे. संपूर्ण भारतात न लोळणारे वाण आणि मशीन द्वारा काढणीस योग्य वाण म्हणून या जातीस प्रसिद्धी मिळत आहे.

## राज्यातील वनौषधी उत्पादकांना शासकीय अनुदानाची प्रतीक्षा

पुणे : राज्यातील वनौषधी शेतीला चालना देण्यासाठी शासनाकडून कृषी उन्नती योजना-एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत अनुदान दिले जाते. या योजनेमुळे उत्पादनवाढीसह शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळते. मात्र, यावर्षी अर्ज करूनही अनुदानाबाबत कोणतीही ठोस हालचाल न झाल्याने वनौषधी उत्पादकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.शेगाव येथे आयुष मंत्रालयाच्या पुढाकाराने आयोजित मेळाव्यात झालेल्या चर्चासत्रात शेतकऱ्यांनी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्यासमोर हा मुद्दा ठळकपणे मांडला. गेल्या काही वर्षांपर्यंत वनौषधी अनुदान योजना आयुष मंत्रालयामार्फत राबविण्यात येत होती. सन २०२१ पासून ही योजना कृषी विभागाकडे वर्ग करण्यात आली. यंदाच्या हंगामात सफेद मुसळी व इतर वनौषधी पिकांच्या लागवडीसाठी अनुदान देण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. सफेद मुसळीला हेक्टरी दीड लाखांपर्यंत अनुदान घोषित झालेले होते. त्यानुसार शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले. शेतकऱ्यांनी कृषी खात्याच्या पोर्टलवर नोंदणी करून पीक पेऱ्याची माहिती व छायाचित्रे अपलोड केली. काही ठिकाणी सहायक कृषी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष प्लॉटला भेट देऊन पाहणीही केली. मात्र, आता अनुदान वितरणाबाबत तांत्रिक कारणे पुढे केली जात असल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत. हंगाम संपत आला तरी अनुदानाबाबत कोणताही निर्णय जाहीर झालेला नाही. दुसरीकडे वनौषधींचे दर १०-१५ वर्षात वाढलेले नाहीत. खर्चात पाचपट वाढ झाली. हवामान बदलाचा फटका या पिकांना बसतो आहे. वनौषधी पिकांना सध्या पीकविम्याचे संरक्षण उपलब्ध नाही. त्यामुळे या पिकांना पीकविम्याच्या कक्षेत समाविष्ट करण्याची मागणीही पुढे येत आहे. शेगाव येथे आयोजित चर्चासत्रात मेळाव्यात विविध भागांतून आलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी मांडल्या. पळशी झाशी (ता. संग्रामपूर) येथील सफेद मुसळी उत्पादक प्रताप मारोडे या पिकाला हमीभाव, पीकविमा व अनुदानातील अडचणी दूर करण्याची मागणी केली. विजय भालतिलक (शेगाव, जि. बुलडाणा) यांनी वनौषधी उत्पादकांना विशेष प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले.






## गायींना होणारे गंभीर आजार आणि त्याची लक्षणे!

महाराष्ट्रात गायीच्या माध्यमातून दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे. अर्थात म्हशींच्या संख्येपेक्षा राज्यात गायींची संख्या देखील अधिक आहे. याशिवाय गायीला हिंदू धर्मात पवित्र स्थान असल्याने, प्रत्येक शेतकऱ्याच्या गोठयात एक तरी गाय आढळते. देशात गायींच्या एकूण ५१ नोंदणीकृत जाती आहेत. याशिवाय अशा सुद्धा काही जाती आहेत, ज्या नोंदणीकृत नाहीत. देशातील एकूण दूध उत्पादनात गायीच्या दुधाचा वाटा ५० टक्के इतका आहे. इतकेच नाही तर देशी गायींवर संशोधन करण्यासाठी उत्तर प्रदेशातील मेरठ या ठिकाणी देशातील सर्वात मोठे कॅटल रिसर्च सेंटर सुरु करण्यात आले आहे.

मेरठ येथे गाय संशोधन केंद्र : गीर, राठी, नागोरी, साहिवाल, बद्री यांसारख्या देशातील देशी गायींच्या अव्वल प्रजाती आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, राजस्थान आणि बिहार या राज्यांमध्ये देशी गायींची संख्या सर्वाधिक आहे. याशिवाय मेरठ येथील गाय संशोधन केंद्रामार्फत देशी गायींची संख्या वाढवण्यासाठी आर्टिफिशल सीमेन टेक्नोलॉजीचा वापर केला जात आहे.

घटसर्प/गलघोटू : या आजारामुळे गायींना श्वास घेण्यास त्रास होतो. आणि घशाला सूज येते. या आजारावर प्रतिजैविक आणि इंजेक्शन दिले जाते. तसेच पावसाळ्यापूर्वी या आजाराचे लसीकरण करून घेणे आवश्यक असते.



कासदाह आजार : दुधाळ गायींना या आजारामुळे कासेमध्ये समस्या उद्भवते. दुधात गुठळ्या येणे, कासेला सूज येणे ही या आजाराची लक्षणे आहेत. या आजारावर वेगवेगळी औषधे दिली जातात. या आजाराबाबत गायींचे दूध आणि कासेची वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक असते.

फऱ्या रोग : या आजारादरम्यान गायींना १०६-१०७ अंशापर्यंत ताप येतो. गायीच्या पायांना सूज येते. या आजारावर पावसाळ्यापूर्वी लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. आजारी गायींना निरोगी जनावरांपासून दूर ठेवणे.

दुग्ध ज्वर : या आजारादरम्यान गायीच्या शरीराचे तापमान कमी होते, श्वास घेण्यास त्रास होतो. अशावेळी गायीच्या प्रसूतीनंतर १५ दिवस दूध काढू नये. वासराला पाजावे. या आजारादरम्यान गायीला कॅल्शियमयुक्त आहार आणि पूरक आहार द्यावा.

लाळ्या खुरकत रोग : गायींच्या तोंडाला आणि पायाच्या खुरांवर पुरळ येतात. हे पुरळ फुटतात आणि जखमा खोल होतात. अशावेळी तात्काळ पशुवैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. याशिवाय या आजारावर पावसाळ्यापूर्वी लसीकरण करून घ्यावे. पावसाळ्यात जनावरांना उघड्यावर चरायला सोडू नये. अंथ्रेक्स रोग : या आजारादरम्यान लघवी आणि शेणात रक्त येते. गायींना खूप ताप येतो. पशुवैद्यकाशी संपर्क साधून परिस्थितीनुसार उपचार करावेत. तसेच या आजारापासून बचाव करण्यासाठी लसीकरण करून घ्यावे.

क्षय रोग (टीबी) : या आजारादरम्यान गाय सुस्त होते. तिला कोरडा खोकला आणि नाकातून रक्तस्त्राव होतो. रोगाची लक्षणे दिसू लागताच गायीला दवाखान्यात दाखल करावे. तसेच या आजारादरम्यान गायीच्या चारा पाण्याची विशेष काळजी घ्यावी. ब्रूसेलोसिस : गायीचे पोट डाव्या बाजूने फुगते. तसेच गायीच्या पोटाला डाव्या बाजूने टॅप केल्यावर ड्रम वाजवल्यासारखा आवाज येतो.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
स्वांतत्र्य दिन मोरोक्को
स्वांतत्र्य दिन टेक्सास
राष्ट्रीय क्रीडा कौशल्य दिन

### महत्वाच्या घटना

१८३६: आजच्या दिवशी टेक्सास ने मेक्सिको पासुन स्वतःचे स्वातंत्र्य घोषित केले.
१८५५: अलेक्झांडर (दुसरा) हा रशियाचा झार बनला.
१८५७: जे. जे. स्कूल ऑफ आर्टस सुरू झाले
१९०३: 'मार्था वॉशिंग्टन हॉटेल' हे फक्त महिलांसाठी असलेले जगातील पहिले हॉटेल न्यूयॉर्क मधे सुरू झाले.
१९३०: आजच्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली काळा राम मंदिरामध्ये सर्वांना प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह करण्यात आला.
१९४६: हो ची मिन्ह यांची उत्तर व्हिएतनामचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली.
१९४९: न्यू मिलफोर्ड, कनेक्टिकट येथे रस्त्यावरील स्वयंचलित दिवे बसविण्यात आले.
१९५२: पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते सिंद्री येथील खत कारखान्याचे उद्घाटन
१९५६: मोरोक्को देशाला फ्रान्सकडून स्वातंत्र्य मिळाले.
१९६९: फ्रेन्च बनावटीच्या 'कॉन्कॉर्ड' या पहिल्या स्वनातीत (ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जाणार्या) विमानाचे यशस्वी उड्डाण
१९७०: ब्रिटनकडून स्वातंत्र्य घेऊन होंडेशिया प्रजासत्ताक बनले.
१९७२: अमेरिकेचे 'पायोनिअर-१०' यानाचे गुरुच्या दिशेने उड्डाण झाले
१९७८: स्वित्झर्लंडमधील दफनभूमीतुन चार्ली चॅप्लिनची शवपेटिका चोरीला गेली.
१९९२: आर्मेनिया, अझरबैजान, कझाकस्तान, किरगिझस्तान, मोल्दोव्हा, सॅन मरिनो, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान, उझबेकिस्तान देश युनायटेड नेशन्स मध्ये सामील झाले.
२००१: मध्य अफगाणिस्तानातील बामिया शहराजवळ प्राचीन आणि अमूल्य ठेवा असलेल्या सुमारे ६,००० बुद्ध मूर्ती धर्मबाह्य ठरवून मूलतत्त्ववादी तालिबानने उखळी तोफा आणि रणगाड्यांच्या साहाय्याने उद्ध्वस्त करण्यास सुरूवात केली.
२००६: आजच्या दिवशी दिल्ली येथे अमेरिका आणि भारत या दोन राष्ट्रांमध्ये आण्विक करार झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४२: विश्वासराव पानिपतच्या ३ र्या युद्धात मारले गेलेले नानासाहेब पेशव्यांचे ज्येष्ठ चिरंजीव (मृत्यू: १४ जानेवारी १७६१)
१९२५: शांता जोग चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री (मृत्यू: १२ सप्टेंबर १९८०)
१९२६: केरळ चे माजी मुख्यमंत्री पी. के. वासुदेवन नायर यांचा जन्म.
१९३१: मिखाईल गोर्बाचेव्ह सोविएत संघाचे शेवटचे अध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते
१९३१: राम शेवाळकर मराठी साहित्यिक (मृत्यू: ३ मे २००९)
१९५१: असे भारतीय जे हॉलीवूड चित्रपटांना सुद्धा आवाज देतात किशोर भट्ट यांचा जन्म.
१९७३: भारतीय चित्रपट अभिनेत्री विद्या मालवडे यांचा जन्म.
१९७७: अँड्र्यू स्ट्रॉस इंग्लिश क्रिकेटपटू
१९८६: भारतीय तिरंदाज जयंत तालुकदार यांचा जन्म.
१९९०: भारतीय चित्रपट अभिनेता टायगर श्रॉफ यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५६८: मीरा रत्नसिंह राठोड ऊर्फ संत मीराबाई
१७००: मराठा साम्राज्याचे तिसरे छत्रपती राजाराम महाराज यांचे सिंहगडावर निधन (जन्म: २४ फेब्रुवारी १६७०)
१९३०: डी. एच. लॉरेन्स इंग्लिश कादंबरीकार, कवी, नाटककार, टीकाकार आणि चित्रकार (जन्म: ११ सप्टेंबर १८८५)
१९३८: उत्तर प्रदेश चे पहिले राज्यपाल हार्कोर्ट बटलर यांचे निधन.
१९४९: सरोजिनी नायडू प्रभावी वक्त्या, कवयित्री व स्वातंत्र्यसेनानी, रौलेट कायदा, मॉन्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणा, खिलाफत चळवळ, साबरमती करार, असहकार आंदोलन यांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. (जन्म: १३ फेब्रुवारी१८७९)
१९८६: डॉ. काशिनाथ घाणेकर मराठी रंगभूमी आणि चित्रपटातील अभिनेते (जन्म: १४ सप्टेंबर १९३२)
१९९४: पं. श्रीपादशास्त्री जेरे धर्म व अध्यात्माचे गाढे अभ्यासक, करवीरभूषण, वेदशास्त्रसंपन्न

## नव्या फळबाग लागवडीपूर्वी मातीचे परीक्षण आवश्यक

नवी फळबाग लागवड करताना मातीच्या विविध घटकांचा विचार व पिकांची योग्य निवड या बाबी महत्त्वाच्या आहेत. तसेच शास्त्रीयदृष्ट्या योग्य पद्धतीने माती परिक्षण करून त्यांचे गुणधर्म तपासून मगच लागवडीचे नियोजन करणे गरजेचे आहे. नवी फळबाग लागवड करताना कोणतीही घाई करू नये.


नव्या लागवडीसाठी मातीचे गुणधर्म : ठरावीक फळझाडांची निवड किंवा नवी लागवड करण्यासाठी मातीचे भौतिक, रासायनिक गुणधर्म विचारात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रयोगशाळेत जाऊन तपासणी करण्याची गरज नाही. यामध्ये खालील गुणधर्मांचा समावेश होतो. १. मातीची खोली: फळझाडांची मुळे जमिनीत खोलवर जात असल्यामुळे खोल मातीची जमीन असणे आवश्यक आहे. ही खोली कमीत कमी ९० सेंमी ते जास्तीत जास्त १२० सेंमी असणे आवश्यक आहे. २. मातीतील निचरा: मातीतून होणारा पाण्याचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. तो चांगला होत नसल्यास अशा जमिनीत पावसाळ्यात पाण्याची पातळी जास्त कालावधीपर्यंत वर असते, त्यामुळे अन्नद्रव्यांचा पुरवठा नियमित होत नाही आणि मातीतून रोगांचा प्रादुर्भाव होतो. ३. मातीचा पोत : फळझाडे मध्यम ते भारी पोत असलेल्या चिकण, वालुकामय पोयटा किंवा पोयटा आदी विविध प्रकारच्या मातीत घेतली जातात. मात्र बहुतेक फळपिकांसाठी पोयटा किंवा वालुकामय पोयटा या प्रकारचा पोत असलेली माती सर्वोत्तम मानली जाते. ४. जमिनीचा उतार : फळबागेसाठी शक्यतो उंच-सखल जमिनीऐवजी सपाट जमीन निवडावी. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून सपाटीकरण आणि ठिबक सिंचन यासारख्या उपाययोजना करून व्यवस्थापन करता येते.

मातीचे रासायनिक गुणधर्म : १. मुक्त चुनखडीचे प्रमाण : हे प्रमाण फळबागेसाठी जमिनीची योग्यता ठरविण्याचा सर्वांत महत्त्वाचा गुणधर्म आहे.



सोमवार दि.२ मार्च २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान जिल्हा कार्यशाळा

## भाजपाचा कार्यकर्ता हा पक्षाचा आत्मा-आ. लोणीकर

## कार्यकर्त्यांना संघटनात्मकदृष्ट्या सक्षम बनवणार -भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्ह्याच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान अंतर्गत जिल्हा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे पार पडलेल्या या कार्यशाळेत आगामी प्रशिक्षण महाभियानाचे सविस्तर नियोजन करण्यात आले. माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, मराठवाडा संयोजक मनोज पांगारकर, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, विजय कामड, बद्रीनाथ पठाडे, सतीश जाधव, देविदास कुचे, वसंत शिंदे, अनिलराव कोलते, शिवाजी थोटे, अक्षय गोरंटयाल, सुनील पवार, गोविंद ढेंबरे, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, सिद्धिविनायक मुळे, संध्या देठे आदींची प्रमुख उपस्थिती



होती.

माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणात बूथ स्तरावरील कार्यपद्धतीवर भर दिला. ते म्हणाले, ''बूथ हे संघटनेचे मूळ घटक आहेत. बूथ समितीची कामे, स्थायी कार्यक्रम, मन की बात, गृभेटी यांचे नियोजन आता अधिक सुयोग्य पद्धतीने करावे लागेल. प्रत्येक कार्यकर्त्याने सरकारच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे.'' त्यांनी पुढे सांगितले की, प्रशिक्षणात कार्यकर्त्यांचे वर्तन, अपेक्षा, कार्यपद्धती, सोशल मीडिया व्यवस्थापन या विषयांवर विशेष लक्ष दिले जाईल. तसेच पंचनिष्ठा ची संकल्पना कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर द्यावे असे प्रतिपादन त्यांनी केले. मराठवाडा संयोजक मनोज पांगारकर यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता चा राजकीय कार्यात वापर या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले, ''आजच्या डिजिटल युगात हे केवळ तंत्रज्ञान नसून ते एक सहायक साधन आहे. भाषण लेखन, अनुवाद, माहिती संकलन, प्रश्नमंजुषा निर्मिती, प्रतिमा व व्हिडिओ निर्मिती यासाठी चा वापर करून आपण आपल्या कामाचा वेग व दर्जा वाढवू शकतो.

होणाऱ्या प्रशिक्षण वर्गात कार्यकर्त्यांना चे प्रशिक्षण दिले जाईल.'' तसेच त्यांनी सरल ॲपच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांचे डिजिटल मूल्यमापन, डिजिटल प्रमाणपत्र वाटप आणि केंद्रीय डेटा राखण्याच्या सुविधांविषयी माहिती दिली. जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांनी भारतीय राजकारणाला दिशा दिली आहे. या प्रशिक्षण महाभियानाच्या माध्यमातून आपण कार्यकर्त्यांना संघटनात्मकदृष्ट्या सक्षम बनवणार आहोत. पंच परिवर्तनाच्या संकल्पनेप्रमाणे सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, स्वदेशी भाव जागरण, कुटुंब प्रबोधन आणि नागरिक कर्तव्ये या पाच मूल्यांचा प्रसार आपण प्रत्येक बूथपर्यंत पोहोचवला पाहिजे.'' प्रशिक्षण केवळ भाषणापुरते मर्यादित न ठेवता, संवाद, केस स्टडी, क्षेत्रीय अनुभव आणि प्रत्यक्ष सराव यांशी जोडले जाईल. तसेच ॲपद्वारे डिजिटल उपस्थिती, प्रश्नमंजुषा व प्रमाणपत्र देऊन प्रशिक्षण अधिक सुव्यवस्थित केले जाईल, असेही ते म्हणाले.

# विज्ञानाची कास धरून विद्यार्थ्यांनी देशाला प्रगत बनवावे-अजय भंडारी



पाथर्डी । प्रतिनिधी

भारतीय नोबेल विजेते शास्त्रज्ञ सर सी.व्ही.रमन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी लावलेल्या रमन इफेक्ट या जागतिक शोध निबंधाच्या स्मृतीनिमित्त पाथर्डी येथील श्री तिलोक जैन विद्यालयात 'राष्ट्रीय विज्ञान दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी यांनी विद्यार्थ्यांना अंधश्रद्धेची जळमटे झटकून विज्ञाननिष्ठ बनण्याचे व संशोधक वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अहिल्यानगर जिल्हा बुवाबाजी संघर्ष कार्यवाह शशिकांत गायकवाड व श्रीकांत काळोखे यांनी सादर केलेले वैज्ञानिक चमत्कारांचे प्रयोग होय विद्यालयाच्या रमण इफेक्ट या कार्यक्रमात शशिकांत गायकवाड यांनी अंधश्रद्धा बुवाबाजीचे पितळ उघडे पाडत ऐतिहासिक दाखले दिले ते म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणताही मुहूर्त न पाहता अमावस्येच्या रात्री अनेक लढाया जिंकल्या ज्या पुण्याला आदिलशाही सरदाराने शापित म्हणून गाढवाचा नांगर फिरवून ओस पाडले होते त्याच भूमीवर राजमाता जिजाऊंनी विज्ञानावर आणि श्रमावर विश्वास ठेवून सोन्याचा नांगर चालवला आणि पुण्याचे पुनरुज्जीवन केले विद्यार्थ्यांनी मोबाईल व सोशल हँडल आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर टाळून त्याचा उपयोग स्वतःच्या व देशाच्या प्रगतीसाठी करावा असेही त्यांनी ठामपणे मांडले यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सर सी.व्ही.रमन यांच्या जीवनावर व त्यांच्या संशोधनावर आधारित भाषणे केली तसेच विज्ञानाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या एकांकिका सादर केल्या विज्ञानातील चमत्कार हे केवळ हातचलाखी आणि विज्ञानाचे नियम आहेत हे प्रत्यक्ष प्रयोगातून पाहिल्यावर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त दाद दिली या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मॉडर्न महाविद्यालयात औद्योगिक तंत्र प्रशिक्षणाचा समारोप

## विद्यार्थ्यांनी आधुनिक ज्ञान आणि तंत्रज्ञान आत्मसात करावे: प्राचार्य डॉ: सानप

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

आधुनिक ज्ञान आणि तंत्रज्ञान सामाजिक विकासाबरोबरच भौगोलिक विकासाला नवी दिशा देणारे ठरत आहे. विद्यार्थ्यांनी आधुनिक ज्ञान व तंत्रज्ञान कौशल्य आत्मसात करून आपले उज्वल भविष्य घडवावे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी व्यक्त केले. छत्रपती संभाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालय आणि प्लेक्स स्किल डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या तीस दिवसीय डाटा अनालिसिस तंत्र प्रशिक्षणाचा समारोप करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ.सानप हे बोलत होते .यावेळी प्लेक्स स्किल डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड चे





प्रबंधक कुलदीप पाटील वरिष्ठ प्रशिक्षक पुष्कराजसिंह राठोड समन्वयक प्रा. हर्षल वाघमारे उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. सानप म्हणाले की, आजच्या युगाची औद्योगिक दिशा लक्षात घेऊन विद्यार्थीनी आधुनिक ज्ञान व तंत्रज्ञान आत्मसात करावे असे म्हटले. प्लेक्स स्किल डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड चे वरिष्ठ तंत्र शिक्षण प्रशिक्षक पुष्कराज सिंह राठोड म्हणाले की, सामाजिक जबाबदारीचे भान ठेवत कंपनीद्वारे विद्यार्थ्यां मध्ये औद्योगिक तंत्रज्ञान विषयक आवड निर्माण व्हावी म्हणून हा उपक्रम जनहितार्थ राबविला जातो. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला पाहिजे असे म्हटले. यावेळी राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्ताने प्रथम नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी व्ही रमण यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. हर्षद वाघमारे यांनी केले. तर शेवटी आभार प्रा. भगत यांनी मानले. यावेळी बहुसंख्य प्रशिक्षणार्थी व विद्यार्थी आणि महाविद्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# दहावी इंग्रजी पेपरमध्ये चूक: विद्यार्थ्यांना चुकीची प्रश्नपत्रिका, कारवाईची मागणी

मंठा । प्रतिनिधी

राजे छत्रपती संभाजी कनिष्ठ महाविद्यालय, हेलस येथील परीक्षा केंद्रावर इयत्ता दहावीच्या इंग्रजी विषयाच्या परीक्षेत गोंधळ उडाला. आज शुक्रवार, २७ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेत पर्यवेक्षक आर. व्ही. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सेकंड/थर्ड पेपर ऐवजी फर्स्ट लँग्वेजची प्रश्नपत्रिका दिली. पहिल्यांदाच परीक्षा देत असलेल्या विद्यार्थ्यांना वेळ संपल्यानंतरच चुकीची पेपर दिल्याचे लक्षात आले.नुकसान झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी मंठा गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे पत्र देऊन संबंधित पर्यवेक्षकाविरुद्ध कायदेशीर कारवाई आणि इंग्रजी विषयात पासिंग गुण देण्याची मागणी केली आहे. याप्रकरणी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिव आणि केंद्र संचालक यांना प्रतही पाठवण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी म्हटले आहे, ''आमचे शैक्षणिक नुकसान होऊ नये ही विनंती.''या प्रकरणाची चौकशी होणार का आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळेल का, हे पाहावे लागेल. गट शिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण यांची प्रतिक्रिया मुलांचे कोणतेही नुकसान होणार नाही व शाळेवर व संबंधित शिक्षकावर कारवाई करण्यात येईल.

# दरोडेखोरांचा धुमाकूळ,दोन कुटुंबावर धारदार शस्त्रांनी हल्ला, दोघे जखमी

अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहिल्यानगर तालुक्यातील नारायणडोह व चिंचोडी पाटील या दोन गावांमध्ये दरोडेखोरांनी धुमाकूळ घालत दोन घरांवर हल्ला करून मारहाण व लूट केल्याची घटना घडली. या दोन्ही घटनांमध्ये दोघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही ठिकाणाहून सुमारे १० तोळ्यांचा ऐवज चोरीला गेला असल्याचा अंदाज आहे.रात्रीच्या वेळी साडेबारा ते एकच्या सुमारास दरोडेखोरांनी चिंचोडी पाटील शिवारातील सुदाम पवार यांच्या कुटुंबाला लक्ष्य केले. अंदाजे पाच दरोडेखारांनी पवार यांच्या घरात घुसून त्यांना मारहाण केली. या मारहाणीत ते जखमी झाले. त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या घरातून ५० हजाराची रोकड व सुमारे अडीच तोळ्याचे दागिने चोरून नेल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, नारायणडोह शिवारात दोन वाजण्याच्या सुमारास पाच अनोळखी दरोडेखोरांनी साठे कुटुंबाच्या घरावर हल्ला करून मारहाण व लूट केली. या घटनेत पंढरीनाथ मारूती साठे (वय ४५) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत त्यांची पत्नी प्रतिभा साठे (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तालुका पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंढरीनाथ साठे हे घराबाहेर धान्याजवळ झोपले होते व कुटुंबातील इतर सदस्य घरात झोपले होते. पहाटे दोनच्या सुमारास आरडाओरड ऐकू आल्याने प्रतिभा यांनी बाहेर पाहिले असता पाच इसम पती पंढरीनाथ यांना कोयता, काठ्या, लोखंडी कटावणी व चाकूच्या सहाय्याने मारहाण करत असल्याचे दिसले. यानंतर दरोडेखोरांनी कटावणीच्या सहाय्याने घराचा दरवाजा उचकावून आत प्रवेश केला. घरातील महिलांना शिवीगाळ व दमदाटी करून आवाज केला तर जीवे मारू अशी धमकी दिली. गळ्यातील सोन्याचे मनीमंगळसूत्र जबरदस्तीने ओढून घेतले. तसेच लोखंडी कपाट तोडून त्यातील सोन्याचे दागिने लंपास केले. विरोध करणाऱ्या सासरे व मुलालाही काठ्यांनी मारहाण करण्यात आली. दरोडेखोरांनी एकूण २ लाख १७ हजार ५०० रूपयांचे सोन्याचे दागिने लुटून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, दरोड्याची माहिती तालुका पोलिसांना मिळताच सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारूळे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. रविवारी सकाळी अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांनी घटनास्थळी भेट देत तपासाच्या सुचना केल्या. स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी, अंमलदारांनी घटनास्थळी भेट देऊन समांतर तपास सुरू केला आहे.

# रस्त्यावर फ्लेक्स लावणाऱ्यांच्या प्रॉपर्टीवर टॅक्स चढवा - आ.संग्राम जगताप

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर शहर आता बदलत असून विकासाच्या दृष्टीने पाऊल टाकत आहे. आता महानगरपालिकेच्या माध्यमातून आग्रही भूमिका घेत काही कडक नियमावली व काही स्वरूपात बंदी घालण्याचे विचारधीन आहे. शहर स्वच्छ करण्याची जबाबदारी प्रत्येकाचीच आहे. संवेदनशील पणे सर्वांनी यामध्ये महापालिकेला सहकार्य करावे. ई कचरा समस्या पूर्ण जगाला भेडसावत आहे. आपल्या नगरमध्येही मोठ्या प्रमाणात ई कचरा असल्याने भविष्यात प्रत्येकाची डोकेदुखी वाढणार आहे. या ई कचऱ्याचे योग्य पद्धतीने निर्मूलन व्हावे यासाठी विचार भारतीने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. भविष्यात नगर शहर फ्लेक्स मुक्त व्हावे यासाठी लवकरच जनरल बोर्ड मध्ये ठराव करावा. जे रस्त्यावर फ्लेक्स लावतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करा किंवा त्यांच्या प्रॉपर्टीवर टॅक्स चढवा. असे कडक निर्णय घेऊन शहरासाठी वाईटपणा घ्यावा लागणार आहे. इंदुर शहराप्रमाणे नगरशहर व्हावे यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जाणार आहेत. महाराष्ट्रामध्ये नगर शहर सर्वात हरित शहर म्हणून पुढे येईल असे नियोजन करत आहोत, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केल.

विचार भारती, महानगरपालिकायांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर शहरात राबविण्यात येत असलेल्या ई कचरा संकलन व निर्मूलन अभियानाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी शहराच्या महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, विचार भारतीचे मार्गदर्शक रवींद्र मुळे, सचिव सुधीर लांडगे, ई कचरा निर्मूलन अभियानाचे प्रमुख उदय भणगे, बहुतांशी नगरसेवक, विचार भारतीचे सदस्य,मनपाचे अधिकारी, कर्मचारी, यांच्यासह विविध एनजीओ सामाजिक संस्था संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या ई वस्तू येथे आणून दिल्या. त्यांचे संकलन यावेळी करण्यात आले. आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, महानगरपालिकेला माझी वसुंधरा अभियानामध्ये द्वितीय पारितोषिक मिळाले; याचे श्रेयामध्ये सर्व नागरिकांचे, महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा व अधिकाऱ्यांचा मोठा सहभाग आहे. आपले नगर शहर स्वच्छ, सुंदर, हरित व्हावे यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे. या उपक्रमांमध्ये नागरिकांनी स्वतः श्रमदान करून शहर स्वच्छ होण्यासाठी मदत करावी. भविष्यात काही नियमावली करण्यात येणार आहे. यामध्ये कुत्र्यांचा, डुकरांचा उपद्रव कमी व्हावा तसेच अतिक्रमण मुक्त शहर व्हावे यासाठी महानगरपालिका नियमावली करणार आहे. महापौर ज्योती गाडे म्हणाल्या, विचार भारतीने सुरू केलेल्या विविध उपक्रमांमध्ये महानगरपालिकेचा सक्रिय सहभाग असणार आहे. ई-कचरा निर्मूलन उपक्रमामुळे नागरिकांमध्ये चांगली जनजागृती झाली आहे. असे उपक्रम कायम व्हावेत. महानगरपालिकेची जिथे जेव्हा गरज पडेल तेव्हा आम्ही बरोबर आहोत, असे आश्वासन दिले. यावेही धनंजय जाधव यांनीही मार्गदर्शन केले. महानगरपालिकेला माझी वसुंधरा अभियानामध्ये द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल रवींद्र मुळे यांनी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांचे विशेष अभिनंदन करून आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात विचार भारतीचे उदय भणगे यांनी उपक्रमाची माहिती देऊन शहरामध्ये २५ ठिकाणी ई कचऱ्याचे संकलन झाले असून या उपक्रमांमध्ये ३० विविध एनजीओ व सामाजिक संस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर लांडगे यांनी केले नगरसेवक निखिल वारे यांनी आभार मानले

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज, जि.बीड**

ई मेल-KAIJTAHSILDAR@GMAIL.COM

**एम ए जी विभाग**

**दुरध्वनी क्र. ०२२४५-२५२६४५**

**क्रं.२०२४/एमएजी/कावि/१११२**

**दिनांक:-२५.०७.२०२४**

**जाहीरनामा**

सर्व जनता मौजे सारणी (सा) ता. केज यांना जाहीर केले जाते की, सारणी (सा) येथील जन्म पावलेला इसम नामे विकास प्रभु गुरव याचा जन्म दिनांक ०४.०१.१९९५ रोजी झालेला असुन व जन्म नोंद आदेश ग्राम पंचायत सारणी (सा) यांना देणे बाबत त्यांचा वडील नामे प्रभु निवृत्ती गुरव यांनी या कार्यालयास दि. २४.०६.२०२४ रोजी अर्ज सादर करुन सोबत ग्राम पंचायत सारणी (सा) यांचे नोंद नसल्याचे प्रमाण पत्र व १०० रुपयाचे स्टॅम्पवर शपथपत्र सादर करुन ग्राम पंचायत सारणी (सा) ता. केज यांना त्यांच्या मुलाची जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे.

२/- विकास प्रभु गुरव याचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पंचायत कार्यालय सारणी (सा) ता. केज यांना जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित
कार्यकारी दंडाधिकारी, केज

# डॉ. विशाल मुळे यांची पदव्युत्तर शिक्षणासाठी निवड; ग्रामस्थांकडून हृद्य सत्कार

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश गावचे भुमिपुत्र डॉ. विशाल मुळे यांनी एमबीबीएस शिक्षण पूर्ण करून पदव्युत्तर एम.डी. (फार्माकोलॉजी) अभ्यासक्रमासाठी निवड मिळविल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयात शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन वडील कल्याण,आई मीरा मुळे यांचा सहकुटुंब हृद्य सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ.गणेश ढवळे यांनी केले.



यावेळी माजी सरपंच बाळासाहेब मुळे,कृष्णा पितळे,पोहे.परमेश्वर तागड, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांची समायोजित भाषणे झाली. शेतकरी कुटुंबातील डॉ. विशाल मुळे यांचे शालेय शिक्षण लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक विद्यालय, लिंबागणेश येथे झाले. त्यानंतर त्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथून एमबीबीएस पदवी संपादन केली. पदवी शिक्षणानंतर त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका येथे दोन वर्षे वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा बजावली. आता त्यांची एम.डी. (फार्माकोलॉजी) या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय, जुहू येथे निवड झाली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. प्रमुख उपस्थितीत माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, माजी सरपंच बाळकृष्ण मुळे, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे, बाळकृष्ण थोरात,पत्रकार हरिओम क्षीरसागर, रमेश गायकवाड, अँड.गणेश वाणी, रामकिसन गिरे,संदीप मुळे, संतोष भोसले, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, रामदास मुळे, शहादेव धलपे, नाना वाणी, किसन आबदार, सुभाष मुळे, विनायक वाणी, रामकिसन गिरे, कृष्णा पितळे, रामचंद्र मुळे , जयदेव गिरे,हौसराव भोजणे, शिवाजी वाणी, श्रीराम वायभट,जिवन मुळे,प्रविण मुळे, रोहित तागड,संभाजी मुळे, प्रकाश मुळे, विश्वंभर मुळे,नवनाथ मुळे, बालाजी मुळे, सोनाली मुळे,मीरा मुळे, आदी मान्यवर उपस्थित होते. गावातील युवकांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात केलेल्या या यशस्वी वाटचालीबद्दल ग्रामस्थांनी अभिमान व्यक्त करत पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# उमेदच्या चंकलंबा प्रभाग समन्वयक यांच्या गलथानपणामुळे महिला बचत गटाचे वाजले तीनतेरा !

माढळमोही । प्रतिनिधी

गेवराई पंचायत समिती अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान ( उमेद) राबवले जात मात्र चंकलंबा प्रभाग समन्वयक यांच्या अक्षम्य दुर्लक्ष मुळे महिला बचत गटाचे पुरते वाटोळे झाले आहे, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियनातुन गट समन्वयक यांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण करून, खेळत भांडवल सह उघोगधंदा साठी विशेष प्रयत्न करत महिलेचे जिवन मान उंचवुन गांव स्तर सहभाग वाठवणे यांची जबाबदारी शासनाने दिली आहे, परंतु हे गट समन्वयक शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी न करता गांवात भांडणे लावणाचे काम करत आहे, हे अभियान सन २०१२ पासुन सुरु झाले, या अभियानाची मुख्य उद्देश महिला सक्षमीकरण करण्याचा आहे, परंतु चंकलंबा प्रभागातील समन्वयक यांनी चोरपुरी,सैदापुर, जोडवाडी, तांदळा टकलेवाडी येथिल महिलांना प्रवाहात आणण्यासाठी वेळच नसल्याने अभियानाचा पुराता बट्याबोळ उडाला आहे

### सीईओ तुम्ही तरी चकलांबा प्रभागाला न्याय द्या

बीड जिल्हा परिषदेला कर्तव्य दक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी लाभले आहेत, तुम्ही तर कामचुकार प्रभाग समन्वयक यांच्यावर कडक कारवाई करुन नवीन गट समन्वयक यांची नियुक्ती करा व या प्रभागात विशेष लक्ष देवुन अनुशेष भरुन काढा आशी मागणी प्रभागातील महीला, ग्रा, पं, संरपंच यांच्या कडून केली जात आहे,

गेवराई पंचायत समिती या ना त्या कारणा वरुन सतत चर्चात आसते, पण शासनाने सन १०१२ पासुन सुरु केलेल्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान ( उमेद) च्या माध्यमातून पुन्हा एकदा प्रकाश झोतात आली आहे, ग्राम विकास यांत्रणा विभागा मार्फत महिला सक्षमीकरणचा उद्देश हाती घेवुन महिलांना बचत करुन शासनाच्या आर्थिकी सहाय करत ग्रामीण व शहरी भागातील महिलेचे जीवन मान उंचावन्यासाठी उमेद अभियानाचा मोठा सहभाग व आधार महिलेसाठी फायदेचा ठरत आसतानाच चंकलंबा प्रभाग मात्र वंचित का हा सवाल भेडसावत आहे, यांचे मुख्य कारण म्हणजे या प्रभागातील कामचुकार समन्वयक यांनी काम न केल्या मुळे अनेक गांवातील महीला या अभियनातुन वंचित राहील्या आहेत, विशेष म्हणजे, बचत गट सहा महिन्यापासून होवुनही या समन्वयक यांनी ऑनलाईन करण्यासाठी काहीच उपाययोजना केल्या नाहीत, ग्राम संघ कार्यरत न झाल्याने फिरत निधी वर्षा अखेर वाटप होवु शकला नाही, शासनाने महीला प्रगत व उन्नत करण्यासाठी लाखो रुपये पडुन आहेत, मागसलेला गांवे चोरपुरी जोडवाडी, टकलेवाडी, सैदापुर, तांदळा हे गांवे जाणून ◀◀ पान ३ वर

# बीड नगरपालिकेच्या कॉम्प्लेक्स गाळ्यांचा ५० वर्षांचा करार व नियमबाह्य व्यवहारांवर प्रश्नचिन्ह

बीड । प्रतिनिधी

नगर पालिकाने निर्माण केलेले व्यापारी कॉम्प्लेक्स, सार्वजनिक दुकाने, गाळे व जागा ५० वर्षांच्या दीर्घकालीन करारावर देण्यात आल्याचे गंभीर प्रकार समोर आले आहेत. हा प्रकार केवळ संशयास्पद नसून थेट कायद्याचा भंग करणारा असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ मधील कलम ७९ नुसार नगरपालिकेच्या अचल मालमत्तेचा दीर्घकालीन भाडेपट्टा देण्यासाठी राज्य शासनाची पूर्वमान्यता बंधनकारक आहे. मात्र बीडमध्ये दिलेल्या ५० वर्षांच्या करारांना अशी मान्यता आहे का, याबाबत आजतागायत एकही अधिकृत कागद सार्वजनिक झाला नाही. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे या गाळ्यांपैकी एकही गाळा खुल्या जाहीर लिलावातून सर्वसामान्य नागरिकांना मिळालेला नाही. सार्वजनिक मालमत्ता वाटपात पारदर्शकता, स्पर्धा व समान संधी आवश्यक असताना, ठराविक लोकांनाच लाभ देण्यात आल्याचा ठळक आरोप होत आहे. यापैकी अनेकांनी पुढे तेच गाळे विक्री केले किंवा भाड्याने दिले, म्हणजेच नगरपालिकेची मालमत्ता खासगी कमाईचे साधन बनवण्यात आली.

इतकेच नव्हे तर काही लाभार्थ्यांनी पालिकेची परवानगी न घेता गाळ्यांच्या स्ट्रक्चरमध्ये मनमानी फेरबदल, स्लॅब, भिंती, शटर बदल, जागा वाढवणे असे बेकायदेशीर बांधकाम केल्याचेही स्पष्ट झाले आहे. सार्वजनिक मालमत्तेत असे बदल करणे हा थेट कायदा व बांधकाम नियमांचा भंग असताना, नगरपालिकेने डोळेझाक का केली? हा प्रश्न ऐरणीवर आहे.

कायदेशीर दृष्टिकोनातून नगरपालिका ही सार्वजनिक मालमत्तेची विश्वस्त आहे, मालक नाही. त्यामुळे लिलाव टाळून, शासन परवानगीशिवाय, दीर्घकाळासाठी मालमत्ता बांधून ठेवणे म्हणजे सार्वजनिक विश्वासाचा विश्वासघात आहे. अशा प्रकारचे ठराव, करार व फेरबदल न्यायालयात आव्हान दिल्यास रद्द होण्याची पूर्ण शक्यता आहे.

**या प्रकरणामुळे पुढील गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत –**

५० वर्षांचे करार

कोणाच्या आदेशाने ◀◀ पान ३ वर

# कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाच्या वापराची तसेच बिबट्या प्रश्नावर उपाययोजनांची आ.धस यांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ दरम्यान सभागृहात बोलताना सुरेश आण्णा धस यांनी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची मागणी केली. राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेती अधिक शाश्वत बनवणे आणि महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत सक्षम करण्यासाठी -ख षी -सीळ २०२६ ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.



कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हवामान अंदाजावर आधारित पेरणी सल्ला, कीड-रोग ओळख, माती परीक्षणावर आधारित खत शिफारस, स्मार्ट सिंचन प्रणाली तसेच बाजारभावाचा अंदाज शेतकऱ्यांना उपलब्ध करून देता येईल, असे त्यांनी सांगितले.तसेच यावेळी प्रत्येक तालुक्यात -ख आधारित कृषी मार्गदर्शन केंद्र स्थापन करावे.शेतकऱ्यांना अनुदानित माती सेन्सर व स्मार्ट सिंचन प्रणाली उपलब्ध करून द्याव्यात.

कृषी विद्यापीठांमध्ये -ख संशोधनासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करावेत.ग्रामीण भागात मजबूत इंटरनेट सुविधा उपलब्ध करावी.

कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना -ख विषयक प्रशिक्षण द्यावे.दरम्यान, आमदार धस यांनी पुणे, अहिल्यानगर, नाशिक आणि बीड जिल्ह्यांमध्ये वाढत चाललेल्या बिबट्या समस्येकडे सभागृहाचे लक्ष वेधले. ग्रामीण भागात बिबट्यांच्या हालचाली वाढत असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

खेड-मंचर येथील रेस्क्यू सेंटरचे काम कौतुकास्पद असल्याचे सांगत त्यांनी

गावपातळीवर बिबट्याबाबत जनजागृती मोहीम राबवावी. एलईडी स्क्रीनद्वारे सूचना व माहिती उपलब्ध ◀◀ पान ३ वर

# विक्रीसाठी जात असलेला १३ लाखांचा गांजा अंबाजोगाईत एलसीबीने पकडला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मा. पोलीस अधीक्षक, बीड यांनी बीड जिल्ह्यामध्ये अंमली पदार्थ विरोधी कारवाई करण्याचे धडक मोहीम सुरु केली असुन बीड जिल्हा पोलीस दलातील सर्व प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखेला अंमली पदार्थ साठा, लागवड, विक्री, व वाहतुक बाबत माहिती काढुन कारवाई करण्याचे आदेशीत केलेले आहे.

दिनांक २८/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, अंबाजोगाई येथे सटवाजी नगर येथील ड्रिमसिटी येथे चारचाकी वाहनांमधुन अवैद्य रित्या अंमली पदार्थ गांजाची विक्री करीता वाहतुक होणार आहे, या मिळालेल्या माहीतीवरुन स्थानिक गुन्हे शाखा येथिल पोउपनि सुतळे व अंमलदार तसेच पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर




येथील अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्त कारवाई करण्याचे नियोजन करुन अंबाजोगाई येथील सटवाजीनगर, ड्रिमसिटी मध्ये सिमेंट रोडवर एक पांढ-या रंगाची

चारचाकी गाडी या ठिकाणी छापा मारला असता गाडीमध्ये दोन निळ्या रंगाचे प्लॅस्टीकच्या पोत्यामध्ये ओलसर, वाळसर व उग्रट वास येत असलेला पान, फुल, बिया, बोंड असलेल्या दाबलेला अंमली पदार्थ गांजा मिळुन आला, वजन केले असता जवळपास २८ किलो गांजा मिळुन आला. सदरील गांज्या वाहतुकीसाठी वापरलेली ◀◀ पान ३ वर

# ठोस आर्थिक धोरणावरच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल - राष्ट्रीय विचारवंत भरत अमदापुरे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात आयोजित प पू गोळवलकर गुरुजी व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प 'वाटचाल विकसित भारताची' या विषयावर गुंफताना भरतजी अमदापुरे (अभियंता क्वालकॉम इंडिया तथा राष्ट्रीय विचारवंत पुणे ) बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, भारत महासत्ता बनवायचा असेल तर कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य, रोजगार क्षेत्रातील प्रगती होणे आवश्यक आहे. आपल्या क्षेत्रात शंभर टक्के क्षमतेने योगदान




देणे गरजेचे आहे. ठोस आर्थिक धोरणावरच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल व २०४७ साली भारत महासत्ता होईल.

या सत्राची सुरुवात दीपप्रज्वलन, भारत माता व प पू गोळवलकर गुरुजी यांचे पूजन करून झाले. यावेळी या सत्राचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया (कोषाध्यक्ष- भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई) , अभय कोकड (अध्यक्ष- प पू गोळवलकर गुरुजी व्याख्यानमाला समिती) ◀◀ पान ३ वर

# शासनाने शिक्षण संस्था चालकांना वेठबिगार समजू नये -प्रा. मोराळे

बीड । प्रतिनिधी



परीक्षा आणि परीक्षेतील गैरप्रकाराशी संस्थाचालकांचा संबंध नाही, शासनाने शिक्षण संस्था चालकांना वेठबिगार समजू नये, असे खडकावून सांगत, परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांकडून अनुचित प्रकार घडल्यास अथवा कॉपी केस झाल्यास मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व संस्थाचालकांवर गुन्हा दाखल करण्याचा आदेश शासनाने रद्द करावा. या मागणीसाठी २८ मार्च २०२६ ला राज्य शिक्षण संस्था महामंडळाची कार्यकारणी या विरोधात शासनाकडे निवेदन देऊन संस्थाचालकांची बाजू मांडणार असल्याचे राज्य शिक्षण संस्था महामंडळाच्या कार्यकारणी सदस्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी प्रसिद्धीला दिले आहे. संपूर्ण राज्यात दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू असून या परीक्षा विविध मंडळामार्फत घेतल्या जातात. परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात कॉपीचे निर्मूलन व्हावे. शिक्षणाची गुणवत्ता टिकवण्यासाठी ही बाब आवश्यक आहे. परीक्षेच्या दरम्यान संस्थाचालक परीक्षेसाठी आपल्या इमारती उपलब्ध करून देतात. शासनाला सहकार्य करतात. एखाद्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांकडून अनुचित प्रकार घडल्यास अथवा कॉपी केस झाल्यास मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व संस्थाचालकांवर गुन्हा दाखल केला जाईल. ◀◀ पान ३ वर

# 'मी तुमची सावित्रीबाई फुले' एकपात्री प्रयोगाचे आयोजन



### जागतिक महिला दिनानिमित्त आष्टीत प्रेरणादायी सांस्कृतिक कार्यक्रम

आष्टी । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आष्टी येथे महिलांसाठी विशेष सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, ९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता पंचायत समितीच्या प्रांगणात हा कार्यक्रम पार पडणार असून परिसरातील महिलांसाठी ही एक प्रेरणादायी पर्वणी ठरणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित 'मी तुमची सावित्रीबाई फुले' हा एकपात्री प्रयोग. याबाबतची माहिती सौ. प्राजक्ताताई धस यांनी दिली. या प्रयोगात सौ. मेघना झुझम (भिंबरकर पाटील) आपल्या प्रभावी ◀◀ पान ३ वर

# आंभोरा पोलीस ठाण्याची 'रझाकारी' सुरू? तपासणीच्या नावाखाली नागरिकांना त्रास

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील आंभोरा पोलीस ठाणे हद्दीत वाहन तपासणीच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांना विनाकारण त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.अचानक नाकाबंदी करून वाहनांची तपासणी करताना काही पोलिस कर्मचाऱ्यांकडून उद्धट वागणूक दिली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रात्री तसेच दिवसा अचानक रस्त्यांवर नाकाबंदी केली जाते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तपासणी आवश्यक असली, तरी महिलांना व लहान मुलांना रस्त्यावर ताटकळत ठेवणे, वाहनचालकांशी अपमानास्पद भाषेत बोलणे आणि अनावश्यक वेळ घालवणे हे प्रकार वारंवार घडत असल्याचे सांगितले जात आहे.एका कनिष्ठ कर्मचाऱ्यानेआम्ही काय नाचायला उभे आहोत का? अशा शब्दांत उत्तर दिल्याचा दावा काही नागरिकांनी केला आहे.

ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, पोलिसांची कारवाई कायद्याच्या चौकटीत आणि सन्मानपूर्वक असावी. महिलांशी व ज्येष्ठ नागरिकांशी गैरवर्तन होणे अमानवी असून,त्यामुळे पोलिसांविषयी नाराजी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावन्त साहेब कार्यालय संबंधित कर्मचाऱ्यांवर चौकशी करून योग्य ती कारवाई करावी,अशी मागणी करण्यात येणार आहे. दरम्यान,या संदर्भात आंभोरा पोलीस ठाणेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळू शकला नाही.पोलिस प्रशासनाकडून अधिकृत स्पष्टीकरण येणे अपेक्षित आहे.

सरपंच परिषदेच्या वतीने बीड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय येथे लेखी तक्रार दाखल करण्याची तयारी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

### पीएमश्री कन्या वडवणी शाळेचे स्नेहसंमेलन चिमुकल्यांच्या कलाविष्काराने गाजले

# स्नेहसंमेलन म्हणजे चिमुकल्यांच्या आनंदाचा उत्कर्ष - गटशिक्षणाधिकारी उजगरे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील पीएमश्री जिल्हा परिषद कन्या केंद्रिय प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा २०२६ हा दि.२७ फेब्रुवारी २०२६ शुक्रवार रोजी अत्यंत उत्साहात आणि दिमाखात पार पडला. यावेळी चिमुकल्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या विविध कलागुणांनी उपस्थित सर्व मान्यवर आणि पालकांची मने जिंकली.

या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात



आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे हे उपस्थित होते. प्रमुख पाहूणे म्हणून वडवणी नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा दिपाली उजगरे, उपाध्यक्षा उषा खळगे, सर्व सदस्य, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुनिल डोईफोडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक दत्तात्रय फासे, ज्ञानेश्वर आळणे, ज्ञानेश्वर वाव्हळ, दत्तात्रय टिपरे, रघुराज यादव तसेच कन्या वडवणी केंद्रातील बहूतांश शिक्षक, ग्रामस्थ, पालक, माता पालक व चिमुकली विद्यार्थी उपस्थित होते. या स्नेहसंमेलनात शाळेतील मुलींनी विविध मराठी व हिंदी गाण्यांवर अतिशय सुंदर नृत्य सादर केले. चिमुकल्यांच्या या अदाकारीला उपस्थित नागरिक आणि पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

# संभाजी सुर्वे यांची शासकीय समितीवर सदस्य म्हणून निवड

बीड । प्रतिनिधी

राज्याचे लोकप्रीय मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांची उन्नती पाहिजे असेल तर त्यांच्या बांदा पर्यंत रस्ता झाला पाहिजे असे उराशी स्वप्न बाळगणाऱ्या महाराष्ट्राच्या लोकनेत्यानी शेतकऱ्यांच्या हिताची योजना चालू केली आहे. ती योजना म्हणजे मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ता. आणि या योजनेच्या समितीवर राज्याचे महसूल मंत्री मा.ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शिफारशीवरून बीड जिल्ह्यात सर्वात पहिला सदस्य म्हणून शेतकऱ्यांची जाण असलेला ऊसतोड कामगाराचा मुलगा संभाजी सुर्वे यांची निवड केली आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, भारतीय जनता पार्टीचे सरकार हे कायम शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत आले आहे. त्या मध्ये शेतकऱ्यांचा अतिशय महत्वाचा विषय म्हणजे शेतीत जाणारा रस्ता. हा रस्ता काही कारणास्तव होत नाही म्हणून तो रस्ता झालाच पाहिजे असे या योजनेचा एकमेव हेतू आहे. या योजनेमुळे शेतकरी बांधवात अतिशय सकारात्मक विचार आहेत. त्या मध्ये ग्रामीण भागातील अनेक लोकांच्या आडी अडचणीला भाजपा युवा नेते संभाजी सुर्वे हे कायम सामोरे जात आले आहेत. आणि योग योग असा की आज त्यांचीच निवड या महत्वपूर्ण समितीवर निवड करण्यात आली आहे.

या निवडीमुळे सामान्य शेतकऱ्यांत एक आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरावरून संभाजी सुर्वे यांना शुभेच्छाचा वर्षाव होत आहे. यावेळी बोलताना संभाजी सुर्वे यांनी मुख्यमंत्री,महसूल मंत्री तसेच उप जिल्हाधिकारी व उप विभागीय अधिकारी बीड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात विज्ञान दिन उत्साहात साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

म.शि.प्रसारक मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एन. के. मुळे होते. तर डॉ. एस के व्यवहारे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवनकुमार शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ. एस. के. व्यवहारे म्हणाले की, दैनंदिन जीवनात विज्ञानाचे महत्त्व आहे. प्रगती साध्य करण्यासाठी प्रत्येकाने वैज्ञानिक ◀◀ पान ३ वर

# संपादक शेख तय्यब यांना मातृशोक

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील सायं दैनिक रिपोर्टर चे संपादक शेख तय्यब व व्यवस्थापक शेख मुबीन यांच्या मातोश्री श्रीमती लियाकतबी सिकंदर शेख यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर रविवारी सकाळी दहा वाजता अत्यंत शोकाकुल वातावरणामध्ये ताकिया मज्जिद येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

सायं दैनिक रिपोर्टरचे संपादक शेख तय्यब व व्यवस्थापक शेख मुबीन यांच्या मातोश्री श्रीमती लियाकतबी सिकंदर शेख या गेल्या काही दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्या आजारावर उपचार चालू होते. मात्र आठ दिवसापासून प्रकृती जास्तच खालावली होती. शनिवारी रात्री ११:३० च्या सुमारास त्यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. यापूर्वी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. ही शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर मध्यंतरीच्या सात वर्षांमध्ये त्यांची प्रकृती ठणठणीत होती. पाच वर्षांपूर्वी शेख तय्यब यांचे वडील शेख शिकंदर यांचे निधन झाले होते. त्यानंतर दोन्ही मुले आईची प्रचंड काळजी घेत होते. माञ दोन वर्षांपूर्वी त्यांना अर्धांगवायूचा आजार झाल्याने त्या अंथरूणावर खिळून होत्या. गेल्या सात आठ दिवसापासून त्यांची प्रकृती जास्तच खालावली अखेर शनिवारी रात्री ११:३० च्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. मृत्यू समयी त्यांचे वय ७२ वर्षे होते. त्यांच्या पाशात दोन मुले, दोन मुली, जावई सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. रविवारी सकाळी दहा वाजता बीड शहरातील ताकदीचा मस्तीत येथे त्यांचा दफनविधी झाला. यावेळी समाज बांधव, मित्रपरिवार, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपादक शेख तय्यब यांच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# तुम्ही नवे पर्व सुरु झालं म्हणता, पण अजितपर्व कधीच संपणार नाही, रोहित पवारांचा सुनील तटकरेंवर हल्लाबोल

**पुणे । प्रतिनिधी**


राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या बैठकीत एकमताने हा निर्णय घेण्यात आला आहे. सुनेत्रा पवार पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा झाल्यानंतर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे (डींपळश्र ढरींज़रीश) यांच्यासह प्रफुल पटेलांनी राज्यात नवे पर्व सुरू झाल्याचे म्हटले आहे, त्यावरती आता शरद पवारांच्या पक्षाचे आमदार रोहित पवार ) या त्यावरून आक्रमक होत, तुम्ही नवे पर्व सुरु झालं म्हणता, पण अजितपर्व कधीच संपणार नाही असं वक्तव्य केलं आहे. अजित पवारांच्या अपघाती मृत्यूबाबत रोहित पवारांनी काही माहिती आणि काही कागदपत्रे देण्यासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरेंची भेट घेतली, या भेटीनंतर रोहित पवारांनी माध्यमांशी




संवाद साधला यावेळी बोलताना रोहित पवार म्हणाले, माझ्यावरती काही लोक आणि सत्तेतील नेते टीका करत आहेत. काल अजितदादांच्या पक्षातील जे काही प्रमुख नेते आहेत त्यांनी सांगितलं की मी इव्हेंट करतो आहे. बर तुम्ही असं म्हणताय की, मी इव्हेंट करतोय, तर मग तुम्ही सत्तेत आहात, एफआयआर हा सगळ्यांचा अधिकार आहे, मी विरोधात आहे म्हणून तुम्ही माझा एफआयआर घेऊ देत नाही, नाहीतर घेतला जात नाही. तुम्ही सत्तेत आहात, तुम्हाला माझ्याबद्दल काय वाटायचं वाटू द्या पण, सत्तेचा वापर करून तपास कोणत्या दिशेने जात आहे हे पाहणं किंवा बाकी सगळं बाजूला ठेवून, साधा एक एफआयआर देण्यासाठी थोडीशी मदत तरी करा, असं आवाहनही रोहित पवारांनी केलं आहे. पुढे ते म्हणाले, नुसती भाषण करत चाललेले आहात, आम्ही सर्वजण महाराष्ट्रातील जनता, इतर पक्षातील लोक, दादांना न्याय कसा मिळेल यासाठी प्रयत्न करत आहेत आणि हे लोक मात्र भाषण करत राजकीय टिप्पणी करत असतील आणि दुर्दैव असं की त्या भाषणामध्ये एक तर महाशय असे बोलले की, नवीन पर्व सुरू झालं आहे, लक्षात ठेवा, अजित पर्व संपणारच नाही, कारण लोकांच्या मनामध्ये दादांप्रती प्रेम आहे, ही घटना घडली याबाबतीत शंका आहेत, त्यामुळे न्याय देण्यासाठी प्रयत्न करायचा असेल तर आजच ती वेळ आहे, आजच एफआयआर घेण्यासाठी कुठेतरी प्रयत्न करा, असं म्हणत रोहित पवार यांनी नाव न घेता सुनील तटकरे, प्रफुल पटेल यांच्यावर टीका केली आहे.

अजित पवारांना कंट्रोल करु शकत नव्हते, पण आता सुनेत्रा पवारांना कंट्रोल करु शकतो असं त्यांना वाटत असेल तर तो त्यांचा (तटकरे-पटेलांचा) गैरसमज आहे. एक पुतण्या म्हणून विनंती आहे की काकींनीही सांभाळून राहावं असंही रोहित पवारांनी म्हटलं आहे, त्याचबरोबर शरद पवारांच्या वक्तव्यावरून राजकीय वर्तुळात चाललेल्या चर्चांवर बोलताना रोहित पवार म्हणाले, अजित पवारांच्या मृत्यूनंतर दुसऱ्या दिवशी कुठेही लोकांना अडचण होऊ नये, दंगल उसळू नये म्हणून लोकांच्या हितासाठी शरद पवार साहेबांनी एक स्टेटमेंट दिलं. ते बोलताना कॅमेऱ्याकडे बघत नव्हते तर त्यांना वाचावं लागत होतं. पवार साहेब इतके भावनिक झाले होते, त्यांच्या तोंडातून शब्द फुटत नव्हते. त्यामुळे त्यांना काही गोष्टी लिहून दिल्या, त्या त्यांनी वाचल्या. याचं तुम्ही आज राजकारण करत आहात.

# सिंहगड किल्ल्यावर आढळला बेपत्ता मजुराचा मृतदेह



**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील ऐतिहासिक सिंहगड किल्ल्यावर बेपत्ता झालेल्या मजुराचा मृतदेह गुरुवारी सायंकाळच्या सुमारास कल्याण दरवाजाच्या दरीत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. दशरथ शंकर धोत्रे (मूळ रा. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे मृत मजुराचे नाव आहे.

दशरथ धोत्रे हे चार दिवसांपूर्वी सिंहगड किल्ल्यावर कामासाठी आले होते. किल्ल्यावरील नरवीर तानाजी मालुसरे समाधी परिसरात पुरातत्व विभागाच्या कामासाठी नियुक्त ठेकेदाराकडे ते इतर चार-पाच मजुरांसमवेत काम करत होते. सर्वजण किल्ल्यावरच वास्तव्यास होते. बुधवारी मध्यरात्रीपासून धोत्रे हे बेपत्ता होते. त्यांच्या सहकाऱ्यांना ते गावाकडे निघून गेले असावेत, अशी शंका होती. दिवसभर त्यांच्याशी संपर्कही होऊ शकला नाही. दरम्यान, सायंकाळच्या सुमारास किल्ल्यावरील कल्याण दरवाजा परिसरात पर्यटकांना दरीत मृतदेह दिसून आला. त्यांनी तत्काळ संबंधितांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच हवेली आपत्ती व्यवस्थापन पथकाचे तानाजी भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत दरीतून मृतदेह बाहेर काढला. त्यानंतर मृतदेह स्थानिक राजगड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. राजगड पोलिसांनी घटनेची नोंद करून पुढील तपास सुरू केला असून मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. घटनेमुळे सिंहगड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# लग्नानंतर अवघ्या तीन महिन्यातच छळ अन् त्रास; नवविवाहितेने इमारतीवरुन उडी घेऊन संपवलं जीवन

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. सासरच्या छळाला कंटाळून नवविवाहीत लग्नानंतर अवघ्या तीन महिन्यात आत्महत्या केली असल्याचं उघड झालं आहे. या नवविवाहितेने इमारतीवरून उडी मारून जीवन संपवलं (झींपश उीळाश छश्ुि) असल्याचं उघड झालं आहे. याप्रकरणी मृत महिलेच्या सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल (झींपश उीळाश छश्ुि) करण्यात आला असून पोलीस या घटनेचा सविस्तर तपास केला जात आहे. दरम्यान या घटनेने परिसरात संताप व्यक्त होत आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना पुण्यातील बाणेर परिसरात घडली आहे. मृत महिलेचं नाव गंगा तेजस बेंबळकर (वय २७) असे आहे. तर तिच्या पतीचे नाव तेजस शिवा बेंबळकर असे आहे. तेजस याने अमेरिकेतून उच्चशिक्षण घेतले आहे. तेजस आणि गंगा यांचा विवाह ३ महिन्यांपूर्वी झाला. मात्र लग्नानंतर गंगाला सासरच्या मंडळींकडून छळाला समोर जावं लागलं. या छळाला कंटाळून गंगाने अवघ्या तीन महिन्यातच आपलं जीवन संपवल्याने हळहळ व्यक्त होत आहे सासरच्या छळाला कंटाळून गंगा या नवविवाहितेने राहत्या इमारतीतून उडी मारून आत्महत्या केल्याचा आरोप गंगाच्या माहेरच्या मंडळींनी केला आहे. याप्रकरणी मृत पावलेल्या महिलेच्या वडिलांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून,नवरा, सासू, नणंद आणि सासरे यांच्या विरोधात पुण्यातील बाणेर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी गंगाच्या वडिलांच्या फिर्यादीवरून घटनास्थळी पंचनामा केला. त्यांना घटनास्थळी सुसाईड नोट सापडली आहे. या सुसाईड नोटमध्ये महिलेने मृत्यूला स्वतः जबाबदार असल्याचे लिहिले मात्र महिलेच्या कुटुंबियांच्या आरोपांवरून पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे

# अभ्यास दौऱ्यासाठी गेलेले पुण्यातील ८० विद्यार्थी दुबईत अडकून पडले

**पुणे । प्रतिनिधी**

अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणवर केलेल्या हलाई हल्ल्यामुळे जगभरात मोठी खळबळ उडाली आहे. या युद्धजन्य परिस्थितीचा मोठा फटका भारतीयांना बसला आहे. हवाई हल्लासाठी इराणची राजधानी तेहरान हिला लक्ष्य करण्यात आले आहे. या युद्धाची झळ आता दुबईला देखील बसत आहे. दुबईवर क्षेपाणास्त्र डागल्यामुळे परिस्थिती आणखी झटिल बनली आहे. वाढत्या तणावामुळे विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. अशातच दुबईमध्ये अनेक भारतीय नागरिक अडकून पडल्याच्या बातम्या समोर येत आहेत. यासंबंधीच्या पोस्ट आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. पुण्यातील पिंपरी-चिंचवडमधील इंदिरा कॉलेजचे ८४ भारतीय दुबईत अडकून पडले आहेत. यामध्ये ८० विद्धार्थी आणि ४ शिक्षकांचा समावेश आहे. हे सर्वजण सुरक्षित असल्याची माहिती सरकारकडून देण्यात आला आहे. या विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्यासाठी हालचाली सुरू आहेत. दुबईतील भारतीय दूतावास आणि भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाशी बोलणी केली जात आहे. हे सर्व विद्यार्थी स्टडी व्हिसिट साठी दुबईमध्ये येथे गेले होते. पण अचानक युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे हे सर्वजण अडकून पडले आहेत. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडून सुद्धा विद्यार्थ्यांना परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. इराणवर होत असलेल्या हवाई हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पुण्यातून दुबईला जाणारी चार विमाने रद्द करण्यात आली आहेत. युद्धजन्य परिस्थिती संपल्यानंतर पुढील तारखेचे पर्यायी उड्डाण प्रवाशांना दिले जातील असे सांगण्यात आले आहे.

# पुणे विमानतळावरून दुबई-अबू धाबी विमान सेवा युद्धजन्य परिस्थितीमुळे रद्द



**पुणे । प्रतिनिधी**

मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे आणि युद्धाच्या परिस्थितीमुळे पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अबू धाबी, दुबईसाठी होणारी चार आंतरराष्ट्रीय उड्डाणे शनिवारी (दि. २८) रोजी रद्द करण्यात आली. त्यामुळे पुण्याहून दुबई, अबू धाबी जाणाऱ्या प्रवाशांची नियोजित कामे रखडली.

अचानक तणावपूर्ण परिस्थितीमुळे शनिवारी पुण्यातून अबुधाबी आणि दुबई भागात जाणारी चार विमाने रद्द केली. यात स्पाईस जेट कंपनीचे (फ्लाईट क्रमांक -एसजी ५१) पुणे ते दुबई, रात्री ८ वाजून ३० मिनिटांनी होणारे उड्डाण रद्द केले. तसेच एअर इंडिया एक्स्प्रेसचे (फ्लाईट क्र. आयएक्स २८३) पुणे ते अबू धाबी, रात्री ९ वाजून ५ मिनिटांनी होणाऱ्या विमानाचे उड्डाण रद्द करण्यात आले. याशिवाय इंडिगो (फ्लाईट क्र. ६ई १४८४/१४८३ दुबई-पुणे-दुबई, रात्री १०.३० वाजता येणारे आणि १ मार्च रोजी पहाटे १ वाजून ३० मिनिटांनी दुबईकडे जाणारे विमान रद्द करण्यात आले आहे. प्रवाशांची तिकीट परतावा किंवा युद्धजन्य स्थिती संपल्यानंतरच्या पुढील तारखांचे पर्यायी उड्डाणांचे पर्याय दिले जात आहेत.

# सराईत गुन्हेगारांना पुणे पोलिसांचा मोठा दणका! एकाचवेळी ९ गुंडांना दोन वर्षांसाठी पुणे जिल्ह्यातून केलं तडीपार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे पोलिसांनी सराईत गुन्हेगारांना मोठा दणका दिला आहे. स्वतःला दादा समजत शहरात दहशत माजवणाऱ्या रेकॉर्डवरील गुंडांना पुणे पोलिसांनी तडीपार केलं आहे. एकाचवेळी शहरातील ९ गुंड पुणे शहर आणि पुणे जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहेत. शहरातील बिबवेवाडी, आंबेगाव, मार्केटयार्ड आणि शहरातील इतर परिसरात दहशत माजवणाऱ्या ९ गुंडाना दोन वर्षांसाठी शहर, तसेच जिल्ह्यातून तडीपार करत, पुणे पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.

शहरात वाढती गुन्हेगारी आणि टोळीयुद्धाचा बिमोड करण्यासाठी पुणे पोलिसांकडून कडक पावले उचलायला सुरुवात केली आहे. तडीपार करण्यात आलेल्या या रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर गुन्हेगारी टोळ्या, तसेच सराइतांच्या दहशतीमुळे नागरिक भयभीत झाले आहेत, तसेच कायदा आणि सुव्यवस्थेला बाधा निर्माण झाल्याने नऊ जणांना तडीपार करण्यात आले. आरोपींविरुद्ध खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, बेकायदा शस्त्र बाळगणे, गंभीर दुखापत करणे, धमकी देणे, मारहाण करणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत.



जालिंदर मसा मोरे (वय ४८ रा. अप्पर इंदिरानगर), अण्णा ऊर्फ गणराज सुनिल ठाकर (वय २६ रा. अप्पर बिबवेवाडी), ओंकार लक्ष्मण सणस (वय २३ रा. बिबवेवाडी), राजु महादेव डेंगळे (वय २२ रा. सुखसागर नगर), आकाश गुलाबराव कांबळे (वय २१ रा.), कृष्णा बबन लोखंडे (वय २४ रा.), आर्यन बापु बेलदरे (वय २४ रा. आंबेगाव बुद्रुक), सोमगौडा गुरन्ना चौधरी (वय ३३, रा. मार्केटयार्ड), साहिल भिमा अष्टगे (वय २० रा. मार्केटयार्ड) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत. दरम्यान, सध्या राज्याच्या काही भागात सातत्याने गुन्हेगारीच्या घटना घडत आहेत. अशा घटना घडून नयेत म्हणून पोलीस प्रशासन सतर्क आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसात पुणे जिल्ह्यात देखील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचं चित्र आपल्याला पाहायला मिळत आहे. या गुन्हेगारीच्या मुद्याची गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहे. वाढत्या गुन्हेगारीच्या मुद्यावरुन सत्ताधारी आणि विरोधक ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप देखील करत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, पुणे शहरातील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी प्रशासन सतर्क झालं आहे. सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यात आलं आहे.

# २० रूपयांच्या उधारीवरून मित्रानेच मित्राचा गळा चिरला

**पिंपरी । प्रतिनिधी**

अवघ्या २० रुपयांसाठी मित्राने मित्राच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करत हत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पिंपरी परिसरात घडली आहे. या घटनेत रवींद्र ज्ञानेश्वर गायकवाड हा गंभीर जखमी झाला असून फरार आरोपी सत्यजित उर्फ सोन्या कांबळे याला पिंपरी पोलिसांनी लातूरमधून अटक केली आहे.




रवींद्र गायकवाड आणि सत्यजित कांबळे हे एकमेकांच्या ओळखीचे होते. बुधवारी रात्री सव्वा आठच्या सुमारास दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. यावेळी 'माझे तुझ्याकडे २० रुपये उधार आहेत' असे म्हणत सत्यजितने रवींद्रच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार केला. या हल्ल्यात रवींद्र गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने महानगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पिंपरी (झळाीळि उीळाश छश्ुि) पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपासाची चक्रे फिरवली. दरम्यान, हल्ल्यानंतर फरार झालेल्या आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांचे पथक लातूर येथे रवाना झाले आणि अवघ्या काही तासांत त्याला बेड्या ठोकण्यात यश आले. अत्यंत क्षुल्लक कारणावरून झालेल्या या हत्येच्या प्रयत्नाच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कडलग यांनी माहिती देताना सांगितलं की, २६ तारखेला साधारण रात्री आठ वाजून पंधरा मिनिटांच्या सुमारास लकी कंट्री बार पिंपरी गावमध्ये समृद्धी हॉटेलच्या बाजूला आहे तिथे तक्रारदार रमेश गायकवाड हा तिथे दारू पिण्यासाठी गेला होता, त्याच्यासोबत त्याचा मित्र सत्यजित उर्फ सोन्या कांबळे गेला होता. वीस रुपयाच्या उधारीवरून दोघांची भांडण झाले, यावेळी सत्यजित कांबळे यांनी त्याच्या मित्राला रवींद्र गायकवाड याच्या गळ्यावर धारदार शास्त्रने वार केला, त्यानंतर तिथून तो पळून गेला, जखमी झालेल्या रवींद्र गायकवाड याला तात्काळ वाय सी एम हॉस्पिटल येथे दाखल केले, त्याचा जबाब घेण्यात आला आहे, त्याच्या तक्रारीवरून पिंपरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे, सत्यजित कांबळे हा फरार होऊन पुण्यामार्गे लातूर येथे गेल्याची माहिती मिळाली, आम्ही तात्काळ पोलीस पाठवून त्याला आज सकाळी तिथून ताब्यात घेतलं आहे. पोलीस त्याला घेऊन पिंपरी येथे येत आहेत. या घटनेचा पुढील तपास आम्ही करत आहोत, आरोपीची फिर्यादीकडे २० रुपयांचे उधारी होती असं फिर्यादीचं म्हणणं आहे, जेव्हा त्याने त्याच्यावर वार केले त्याचं म्हणणं होतं की माझे तुझ्याकडे २० रुपये उधारी आहे, ते पैसे मला परत दे, आरोपीला आणल्यानंतर तपासानंतर सर्व गोष्टी समोर येतील, अशी माहिती ही पोलिसांनी दिली आहे.

# लोणी काळभोर मुळा-मुठा नदीपात्रातील कचऱ्याची आग कायम; श्वसनाचा त्रास झाल्याने विद्यार्थी रुग्णालयात

**पुणे । प्रतिनिधी**

लोणी काळभोर परिसरातील मुळा-मुठा नदीच्या पात्रात अवैधरित्या टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याला शुक्रवारी सकाळी भीषण आग लागल्याची घटना समोर आली. या आगीमुळे परिसरात प्रचंड विषारी धुराचे लोट पसरले असून श्वास घेण्यास त्रास झाल्याने एमआयटी शिक्षण संकुलातील काही विद्यार्थ्यांना शुक्रवारी मध्यरात्री जवळच्या रुग्णालयात भरती करावे लागले. एमआयटी शिक्षण संकुलातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न सुरू होते. एमआयटी शैक्षणिक संकुलात सध्या राज्यासह देश-विदेशातून आलेले जवळपास २०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी जवळपास ५,००० विद्यार्थी व १,००० कर्मचारी शैक्षणिक संकुलाच्या परिसरात वास्तव्यास आहेत. नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला लागलेली आग अग्निशमन दलाने शुक्रवारी दिवसभर प्रयत्न करूनही विझवता आली नाही. त्यामुळे रात्री ती आणखी वाढून विषारी धुराचे प्रचंड मोठे लोट परिसरात जमा झाले.

यामुळे वसतिगृहातील तसेच परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होणे, डोळ्यांची जळजळ होणे, घसा बसणे इत्यादी त्रास झाला. तसेच, शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांना विषारी धुरामुळे शुक्रवारी मध्यरात्री अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात भरती करण्यात आले. विषारी वायूच्या लोटांमुळे परिसरातील दृश्यमानता प्रचंड कमी झाली. याचा परिणाम शनिवारी पहाटे



पुणे-सोलापूर महामार्गावरील वाहतुकीवरही झाला. तसेच, या विषारी धुराच्या लोटांमुळे परिसरातील एका कंपनीच्या कर्मचाऱ्यांना व एमआयटी शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांना शनिवारी सुट्टी द्यावी लागली.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून लोणी-काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीचे सरपंच, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, पोलिस पाटील व स्थानिक अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. स्वच्छ भारत मोहिमेच्या पार्श्वभूमीवर देशभरात स्वच्छता आणि नदी संवर्धनासाठी प्रयत्न सुरू असताना, लोणी काळभोर येथे मात्र पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर थेट कचरा टाकून तो जाळण्याचा प्रकार अनेकदा उघडकीस आला आहे.

लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती या पुणे शहराला लागून असलेल्या मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायती आहेत. त्यामुळे सदर ग्रामपंचायतींच्या हद्दीत दररोज मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा निर्माण होतो. परंतु या ठिकाणी कचरा संकलनासाठी जागा तसेच कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तांत्रिक प्रकल्प आजमितीस उपलब्ध नाही. त्यामुळे नाइलाजास्तव दररोज सुमारे ३० ते ३५ ट्रॉलींहून अधिक कचरा थेट मुळा-मुठा नदीपात्रात टाकला जातो. परिणामी, नदीपात्रात आता कचऱ्याचे मोठे ढीग तयार झाले असून परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सदर ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. त्यात आता या कचऱ्याला सातत्याने आग लागण्याचे प्रकार वाढत असल्याने वायुप्रदूषणातही कमालीची वाढ झाली असून परिसरातील नागरिकांना श्वास घेणेही कठीण झाले आहे. नदीपात्रात कचरा टाकल्यामुळे केवळ वायुप्रदूषणच नव्हे, तर जलप्रदूषणही वाढत असून मुळा-मुठा नदीचे पाणी दूषित होत आहे. त्यामुळे जलचरांच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे मत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले आहे.